# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ★ LIBRARY ★
8/3/08

३ ● धांडोळा
५ ● युरोपियनांना भावलेला बौद्ध धर्म - युरोमन
१० ● देशोदेशींचे बोलके 'जेन्डर बजेट'
१५ ● भारताचे भवितव्य: एकात्मिक चिंतन
२२ ● (झगमगणाऱ्या) दिव्यांखाली अंधार....
२७ ● अर्थसंकल्पाचा वाटाड्या
३८ ● जिकडे-तिकडे
● 'बर्ड फ्लू'चा प्रश्न चीनने असा हाताळला...
४० ● 'काल'चे 'आज'साठी
(....करावा ग्रामोद्धार ग्रामोद्योगांनी)

खंड ४ : अंक १२ मार्च २००६

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---

**वर्गणीसाठी पत्ता :**


व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**
**खंड ४ (अंक १२) मार्च २००६**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेखन देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्दिष्ट. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती-तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# धांडोळा

सध्या आपल्या सगळ्यांच्याच आयुष्याला भयानक वेग आला आहे. हा वेग पुन्हा दिवसेंदिवस वाढतो आहे. अखंड पुढे धावणाऱ्या काळाच्या गतीशी मिळतेजुळते घेण्यासाठी आटापिटा करताना या धावपळीत आपण काय आणि किती मागे सोडले आहे, याचाही अंदाज येत नाही. कारण, भूतकाळाबाबत विचार करायलाच आपल्याला वेळ नसतो. परिणामी, वाढत्या वेगाबरोबरच भूतकाळाशी असणारा आपला सांधा उत्तरोत्तर विरळ होत जात असल्याचे आपल्या अनुभवास येते. पण म्हणूनच, 'सिंहावलोकन' नावाच्या संकल्पनेचे माहात्म्य आपल्याला मान्य करावेच लागते. अंमळ मागे वळून पाहिले की आपण केलेल्या प्रवासाचा लेखाजोखा जरा नीट मांडता येतो. धावण्याच्या या नादात आपण काय मिळवले आणि खरोखरच किती आणि काय गमावले याचा ताळेबंद न्याहाळता येतो. घडून गेलेल्या चुका उमगतात. त्या टाळण्याचे, तेव्हा न सुचलेले, मार्गही नजरेसमोर उमटतात. एकूणच, भूतकाळाचा असा घेतलेला धांडोळा भविष्यातील आपली वाटचाल सुकर बनविण्यास साहाय्यकारी ठरतो. पुढील प्रवासात उपयोगी पडेल असे पाथेय पूर्वीच्या संचितातून हुडकून काढता येते. आपल्या संचितामधून अन्य देशांनी, त्या देशांमधील नागरिकांनी जो सत्वांश सेवन केला असेल त्याचाही परिचय आपल्याला नव्याने होतो. त्यातून, आपल्याच परंपरेतील, आपल्याच प्राचीन विचारविश्वातील शाश्वत चिंतनसाराचे मर्म आपल्या मन-बुद्धीवर प्रकर्षाने बिंबते. वाहून गेलेल्या काळाचा या पद्धतीने घेतलेला धांडोळा वर्तमानाची आपली समज प्रगल्भ बनविण्यास हातभार लावण्याबरोबरच भूतकाळाशी विरळ होत चाललेल्या आपल्या नात्याची आजच्या संदर्भात नव्याने सांधेजोड घडवून आणतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या या अंकातील बहुतेक लेखांचे अंतरंग हे याच धर्तीचे आहे. आर्थिक साक्षरतेची समाजातील वाढती गरज ध्यानी घेऊन अर्थसंकल्पाशी संबंधित विविध संकल्पनांची एक सार्थ सूची या अंकात देण्याचे धाडस केले आहे. हा एक प्रयोगच आहे. 'अर्थबोधपत्रिके'च्या वाचकांना हा प्रयोग कसा वाटतो ते जाणून घेण्याची उत्सुकता आहे.

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'च्या फेब्रुवारी २००६च्या अंकातील 'ग्रामीण रोजगार हमी कायदा म्हणतो...' हा लेख वाचला. याच विषयावर आपण अधिक माहिती देणार आहात असे संपादकीयात (पृष्ठ ३) वाचून बरे वाटले. 'ग्रामीण रोजगार हमी योजने'बाबत दूरदर्शनवरील जाहिरात बघून या संदर्भात उत्सुकता वाटत होती. त्यामुळे आपण देत असलेल्या माहितीबाबत आपले आभार मानावयास हवेत. माझ्या मुलाला त्याच्या नोकरीच्या निमित्ताने गावपातळीवर जावे लागते; त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील प्रश्नांची मला काही प्रमाणात कल्पना आहे. तसेच मी स्वतः वैद्यक व्यावसायिक असल्यामुळेही मला त्या स्तरावरील प्रश्नांबाबत माहिती आहे. या विषयाबाबत आपण जे अधिक लेखन देणार आहात त्यात खालील बाबींसंदर्भात उल्लेख व स्पष्टीकरण होणे आवश्यक वाटते. 'ग्रामीण कुटुंब' या संज्ञेची व्याख्या या योजनेसंदर्भात काय केली आहे ? आपल्याकडे निरक्षर व्यक्तींचे प्रमाण एकंदर बरेच आहे. अशांपैकी ज्यांना रोजगार हवा आहे त्यांचे लेखी अर्ज, छायाचित्रे हे सारे ग्रामपंचायतीपर्यंत कसे पोहोचावेत ? महाराष्ट्राच्या कोणत्या जिल्ह्यांत या कायद्याची अंमलबजावणी होणार आहे ? पुढील लेखांमध्ये याबाबत ऊहापोह होईल, अशी अपेक्षा आहे. 'टायर्सद्वारेही प्रदूषण' हा लेखही उत्तम आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था जर खरोखरच उत्तम असेल तर वाहनांची संख्या कमी होऊ शकते. पण यादृष्टीने आपल्याकडे किती प्रयत्न होतात ? 'अस्थिशृंखला' (कांडवेल) या वनस्पतीवर दिल्ली येथील भारतीय आयुर्वेद संशोधन संस्थेत संशोधन चालू आहे, असे समजते.

**डॉ. शशिकांत साठ्ये, पुणे**

## एक विनंती...

वाचकांचा प्रतिसाद हा कोणत्याही लेखन-संपादन व्यवहारातील जितका आनंदाचा तितकाच प्रबोधक भाग असतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या अंतरंगासंदर्भात समाधान व्यक्त करणारी वाचकांची पत्रे ही उत्साह वाढविणारी अशीच असतात. परंतु त्याच्याच जोडीने, पत्रिकेकडून असणाऱ्या अपेक्षाही शब्दबद्ध करून पत्ररूपाने मांडल्यास अधिक संतोष होईल.

-संपादक

सांस्कृतिक

# युरोपियनांना भावलेला बौद्ध धर्म - युरोयान

युरोपमधील नागरिकांचे बौद्ध धर्माप्रती वाढते आकर्षण हा अनेक अभ्यासकांसाठी कुतूहलाचा विषय ठरला आहे. या आकर्षणाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केला आहे. अशा काही अभ्यासांमधून युरोपमधील बौद्ध धर्माचे पुढे आलेले हे स्वरूप.

परंपरागत बौद्ध धर्म पूर्णपणे स्वीकारणाऱ्या पाश्चिमात्यांची संख्या थोडी असली तरी बौद्ध धर्माच्या शिकवणीतील काही महत्त्वाचा भाग - **विशेषतः ध्यानधारणा** - दैनंदिन जीवनांत आणणाऱ्यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे व्यवहारतः त्यास अनौपचारिक वा अनामिक बौद्धधर्माचे काहीसे स्वरूप प्राप्त होत असल्याचे मेट्झ् या अभ्यासकाने म्हटले आहे. या संदर्भात उपलब्ध असलेले साहित्य आणि ध्यानधारणेचे विविध

*युरोपमध्ये बौद्ध धर्म पसरत असून 'युरोयान' आकाराला येत असल्याची माहिती देणारा लेख अर्थबोधपत्रिकेत (जानेवारी २००६) प्रसिद्ध करण्यात आला होता. प्रस्तुत लेखात बौद्ध धर्मातील नेमक्या कोणत्या बाबी युरोपियनांना आकर्षित करीत आहेत त्याची मांडणी करण्यात आली आहे.*

प्रकारचे चालू असलेले प्रशिक्षण वर्ग याची साक्ष देतात, असे ते म्हणतात. ज्या पाश्चिमात्य नागरिकांचे समाधान ख्रिस्ती धर्माद्वारे होऊ शकलेले नाही व ज्यांना पूर्वेकडील ज्ञानाचे आकर्षण वाटते अशांची संख्या यात जास्त आहे. त्यामुळे अशा नागरिकांच्या दैनंदिन जीवनांत धार्मिक सरमिसळ आढळते. परंपरागत बौद्ध धर्मातील बाबींशी त्यांचा थेट संबंध असतोच असे नाही. बर्नेट या अभ्यासकाने असे नोंदविले आहे की, अशा सरमिसळीतून बौद्ध धर्माशी नाते सांगणाऱ्यांच्या संख्येमुळेच बौद्ध धर्माचा प्रसार युरोपमध्ये झालेला दिसतो. या सरमिसळीतून बौद्ध धर्म पश्चिमेकडे विविध स्वरूपांत आढळत असला तरी त्या सर्वांच्यात एका प्रकारचे साधर्म्य असते आणि त्यांच्या उगमाचे मूळही सारखेच असते.

# गौतम बुद्धांच्या बौद्ध धर्मातील प्रमुख आचारविचार

- बौद्ध धर्म हा मुख्यतः आचारधर्म. त्यात दैनंदिन व्यवहारांतील कर्माला प्राधान्य.
- ईश्वर आहे की नाही या प्रश्नाचे उत्तर या धर्मात नाही. ईश्वराचे अस्तित्व मानण्यासाठी कोणताही तर्क उपलब्ध नाही असे गौतम बुद्धांना वाटत होते. ते अनीश्वरवादी होते. ईश्वरापेक्षा मनुष्याने आपल्या बुद्धीवर, कर्मावर विश्वास ठेवावा असे त्यांना वाटे.
- जे विषय बुद्धीला ग्रहण होत नाहीत आणि ज्यांच्याविषयी केवळ तर्क आणि अनुमानच करावे लागते, अशा विषयांवर गौतम बुद्धांनी जोर दिला नाही.
- विश्वाची उत्पत्ती, ईश्वराचे अस्तित्व यांपेक्षा मानवी जीवनाशी संबंधित प्रश्नांवर या धर्माचा भर. या धर्माच्या मते विश्वाचे प्रश्न सुटल्याशिवाय मानवी जीवनाचे प्रश्न सोडवता आले पाहिजेत. कारण मानवी जीवित अल्पकालिक आहे. विश्वाचा प्रश्न सुटेपर्यंत थांबायला माणसाला अवसरच नाही.
- हिंदू धर्मातील जन्मांतरवाद व कर्मफलवाद या धर्माने स्वीकारला आहे.
- माणसाचे बरे-वाईट होणे, तसेच त्याला सुख किंवा दुःख होणे, हे त्याचे कर्म व चारित्र्य यांवर अवलंबून आहे.
- या धर्मातील चार आर्यसत्ये अशी - **(१) दुःख** - या जगातले प्रत्येक कार्य, प्रत्येक घटना, यांमध्ये दुःखाचेच सर्वत्र साम्राज्य आहे. **(२) दुःखसमुदाय** - दुःखाचे मूळ कारण तृष्णा आहे, जी वारंवार प्राण्यांना पुनर्जन्म घ्यायला लावते. **(३) दुःखनिरोध** - या तृष्णेपासून पूर्णपणे विरक्त होणे म्हणजे दुःखनाश. यालाच 'निर्वाण' असेही म्हणतात. **(४) अष्टांगिक मार्ग** - दुःखनिरोधासाठी असलेले आठ मार्ग हे महत्त्वाचे. त्यात **सत्यवचन, सत्कर्म, न्यायपूर्ण उपजीविका, दुर्गुणांचा क्षय होण्यासाठी व्यायाम, चित्तशुद्धी, चित्ताची एकाग्रता (ध्यानधारणा), राग, द्वेष व हिंसा यांचा त्याग व ज्ञान यांचा समावेश होतो.**
- निर्वाण हे बौद्धधर्माचे अंतिम साध्य आहे. निर्वाण म्हणजे जीवनमुक्तीच होय.
- मनुष्याला आपले निर्मल रूप प्रकट व्हावे, असे वाटते. पण ज्याचे आचार-विचार निर्मल असतात, त्यालाच ते प्राप्त होते असा आशय या धर्मात आहे.

युरोपमधील बौद्धधर्म हा फार लवचीक आहे, याचे मुख्य कारण म्हणजे हा धर्म प्रामुख्याने आचारधर्म आहे. यात व्यक्तींचे आचरण महत्त्वाचे असल्याने तो मुळातच व्यक्तीव्यक्तींप्रमाणे घडत जातो व त्याचा प्रसार होत राहतो. दुसरे म्हणजे इतर धर्मांचा अवलंब करतानाही कोणतीही व्यक्ती हे आचार अंगी बाणवू शकते. इतिहास असे सांगतो की, गौतम बुद्धांच्या निर्वाणानंतर त्यांच्या शिष्यगटांच्या रुचीप्रमाणे आणि वैयक्तिक धारणांप्रमाणे, गरजांप्रमाणे हा धर्म अनेक संप्रदायांत विभागला गेला होता. आताही युरोपमध्ये तसेच काहीसे घडते आहे. पाश्चिमात्य नागरिक आपल्या दैनंदिन जीवनांत, आपापल्या प्रकृतीनुसार या धर्मातील विविध बाबी स्वीकारत आहेत (फक्त एक मोठा फरक एवढाच की, त्यातून वेगळे संप्रदाय मात्र निर्माण होताना दिसत नाहीत). उदाहरणार्थ, काहींना त्यातील पहिले सत्य - दुःखाबाबतचा विचार, करुणा या बाबी जवळच्या व महत्त्वाच्या वाटतात; तर काहींना त्यातील गूढवाद जवळचा वाटतो. काहींना आध्यात्मिकता व भक्तीशी जवळीक साधणारा तसेच कला व सौंदर्याचे अंग जोपासणारा तिबेटमधील बौद्ध धर्म पटतो. काहींना त्यातील धार्मिक क्रियाकर्म आवडते तर काहींना त्यातील बुद्धिवाद भावतो. असे असले तरी पाश्चात्यांना बौद्धधर्मातील 'झेन'तत्त्वज्ञानाने जास्त आकर्षित केले आहे.

'झेन' हा महायानातील एक प्रकार होय. याचे मूळ जपानमध्ये सापडते. खरे तर झेनचा शब्दशः अर्थ आहे 'ध्यान' (मेडिटेशन). भारतात स्थापन झालेल्या बौद्ध धर्माचा प्रसार चीनमध्ये झाला तेव्हा भारतीय भाषेतील 'ध्यान' हा शब्द चिनी भाषेत 'चान' वा 'चॅन' असा झाला. हा धर्म चीनमधून जपानमध्ये पसरला तेव्हा या 'चान'चे 'झेन' असे नामकरण झाले. ध्यानधारणेतून आध्यात्मिकता वाढीस लागते, तो आत्मज्ञानाचा एक मार्ग आहे, हा 'झेन' तत्त्वज्ञानाचा गाभा होय. 'सभोवतालच्या परिस्थितीतून मानसिकदृष्ट्या बाहेर पडून मनावर नियंत्रण आणण्यासाठी करण्यात आलेला व्यक्तिगत प्रयत्न', या दृष्टिकोणातून भारतीय पद्धतीतील ध्यानधारणेकडे बघितले गेले. तर, 'व्यक्ती व सभोवतालची परिस्थिती यांच्यातील परस्परसंबंधांकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोण', म्हणून झेन तत्त्वज्ञानात ध्यानधारणेला महत्त्व देण्यात आले आहे. 'झेन अँड क्रिएटिव्ह मॅनेजमेन्ट', 'झेन अँड द आर्ट ऑफ मोटरसायकल मेन्टनन्स' अशी काही पुस्तके तसेच 'झेन'शी संबंधित असलेले ज्युदो, केंदो, इकेबाना असे काही प्रकार युरोपमध्ये अलीकडे लोकप्रिय होत आहेत. देईसे टी. सुझुकी यांनी झेन तत्त्वज्ञान समाजासमोर आणले.

आधुनिक पाश्चात्य जीवनपद्धतीतून उद्‌भवणाऱ्या ताणतणावांना सामोरे जाताना बौद्ध धर्मातील ध्यानाचा मार्ग अनेकांना जवळचा वाटलेला दिसतो. मानसिक शांतीच्या शोधात असणाऱ्यांना ध्यानधारणेचा बराच उपयोगही झालेला आहे. या आंतरिक शांतीद्वारेच व्यक्तीव्यक्तींच्या मनांतील प्रेम व कारुण्य या भावना वाढीस लागतात आणि त्याचा फायदा समाजाला होतो. ध्यानधारणा करताना मनाला उल्हसित करणारी, डोळ्यांना शांतता देणारी गुलाबाच्या फुलासारखी एखादी वस्तू समोर ठेवावी, असे सांगितले जाते. मूर्त गोष्टीवर मन केंद्रित करण्याची सवय झाली की कारुण्य, शांती अशा अमूर्त गोष्टींवर लक्ष केंद्रित करता येते. यातून मन स्वस्थ आणि निरोगी बनतेच शिवाय एक वेगळे मानसिक स्वातंत्र्यही प्रतीत होते, असा अनुभव अनेकांनी घेतला आहे (आजच्या आधुनिक मेंदूसंशोधनानेदेखील ध्यानधारणेतून होणारे मानसिक व शारीरिक बदल मान्य केले आहेत).

व्यक्तिगत गरजांप्रमाणेच, पाश्चात्य जीवनपद्धतीच्या विविध अंगांना सामावून घेत तिथल्या समाजजीवनातही बौद्ध धर्माचा विस्तार होत असल्याचे आढळते. उदाहरणार्थ, प्राणी हक्क संघटना, मानसशास्त्र आणि मानसचिकित्साशास्त्र यांच्याशी संबंधित गट, विज्ञानाशी संबंधित व्यक्ती वा गट, पर्यावरणवादी गट आणि ख्रिस्ती धर्मोपदेशकांचे गट अशा अनेक गटांमध्ये बुद्धविचारांना मान्यता मिळते आहे.

पाश्चात्य आचारविचारांचा प्रभाव असलेली 'फ्रेंडस् ऑफ वेस्टर्न बुद्धिस्ट ऑर्डर' अशी एक संघटना ब्रिटनमध्ये १९६७ साली स्थापन करण्यात आली होती. पाश्चात्य जगताला बौद्ध धर्माच्या जवळ आणण्यासाठी या संघटनेला बऱ्याच तडजोडी कराव्या लागल्या, अशी टीकाही महायानाच्या जवळ जाणाऱ्या या संघटनेवर करण्यात आली होती. पण योगसाधना, ताई-ची, कलेप्रती रुची आणि परस्परसंवाद इत्यादींद्वारे या संघटनेने अनेक युरोपियनांना आकर्षित केले. १९७० आणि १९८०च्या दशकांत ब्रिटनमध्ये 'निशिरेन दाइशोनिन बुद्धिझम'ने अनेकांना आकर्षित केले. निशिरेन (इसवी सन १२२२ ते १२८२) या जपानी व्यक्तीने या पंथाची स्थापना केली. निशिरेन यांनी नीतिनियमांना महत्त्व देणाऱ्या 'लोटस सूत्रा'ला (महायानातील बौद्धसाहित्य, 'लोटस' म्हणजे कमळ - कमळाला बौद्ध धर्मात फार महत्त्व आहे) समाजापुढे आणले. १९७४ मध्ये रिचर्ड कॉसन या ब्रिटिश व्यापाऱ्याने जपानमध्ये असताना याचा अवलंब करण्यास सुरुवात केली. ब्रिटनमध्ये परतल्यानंतर त्याने निशिरेनचा अवलंब करणाऱ्या जपानमधील 'सोका गक्कई इंटरनॅशनल' या संघटनेची ब्रिटनमधील शाखा सुरू केली.

याकडे अनेक नागरिक आकर्षित झाले; कारण, या तत्त्वांचा अवलंब करणाऱ्यांना यशस्वी व सुखी जीवन हमखास मिळेल अशी खात्री देण्यात येत होती. हे सुखदेखील अतिशय सोप्या मार्गाने मिळू शकत होते. 'नाम म्योहो रेंगेक्यो' ('होमेज टू द लोटस ऑफ गुड लॉ') ही प्रार्थना म्हणणे आणि 'लोटस सूत्रा'तील दोन प्रकरणे वाचणे एवढेच यात अपेक्षित होते.

युरोपमध्ये असेही घडले आहे की, अनेक नागरिकांना एखाद्या धर्माची गरज वाटत होती; पण त्यांचा 'ईश्वर' या संकल्पनेवर विश्वास नव्हता. त्यामुळे ईश्वराला न मानणारा बौद्ध धर्मही युरोपमध्ये मान्य झालेला दिसतो. तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांनी या संदर्भात असे मत व्यक्त केले आहे की, 'बौद्ध धर्म हा निरीश्वरवादाचा एक प्रकार आहे; तसेच तो एक प्रकारचा मानवतावाद आहे. बौद्ध धर्म मान्य करणाऱ्या अनेकांना ईश्वराच्या अस्तित्वविषयक चर्चांमधून दूर होता आल्याने त्यांना एकप्रकारे स्वातंत्र्यच मिळाले.'

बौद्ध धर्मातील सहिष्णूतेनेदेखील अनेकांना आकर्षित केले आहे. बौद्ध धर्माचे आचारविचार, साहित्य इत्यादी बाबी कुणाला परंपरागत पद्धतीने, हटवादी भूमिकेतून शिकविल्या/सांगितल्या जात नाहीत. हा धर्म कुणावर लादला जात नाही. ज्याला तो पटतो त्याला तो स्वीकारण्याची मुभा आहे. समानतेसारखी नीतीमूल्ये त्यात केंद्रस्थानी आहेत. तसेच त्याद्वारे इतरधर्मियांप्रती द्वेष, मत्सर, असूया अशा कोणत्याही भावना शिकविल्या जात नाहीत. उलट या आचारविचारांतून समाजातील विविध घटकांमध्ये स्नेहभाव वाढीस लागण्याच्या शक्यता वाढतात असे काहींना वाटते.

व्यक्तींच्या कर्मांवर भर देणारा हा धर्म कर्मकांडापासून बऱ्याच प्रमाणात दूर राहिला आहे. तसेच दुःख, हांव, द्वेष, अज्ञान यांतून बाहेर पडण्यासाठीचा अष्टांगिक मार्गही या धर्माने सुचविला आहे. अनेकांना तोही योग्य वाटला आहे. या मार्गाचा शेवट निर्वाणाद्वारे होतो. बौद्ध धर्माचे अंतिम ध्येय निर्वाण हे आहे. निर्वाण म्हणजे दुःखापासून, तृष्णेपासून सुटका. जीवन-मृत्यूच्या फेऱ्यांतून सुटका. ही संकल्पनाही अनेकांना भावली आहे.

*(संदर्भ - बुद्धिझम : ऑन द राइज इन द वेस्ट, बुद्धिझम - अ ब्रीफ इंट्रोडक्शन फॉर वेस्टनर्स, ख्रिश्चन एन्लाइटमेन्ट, द रिलिजन्स ऑफ एशिया, भारतीय संस्कृतिकोश खंड ६, एन्सायक्लोपिडिया ऑफ फिलॉसॉफी, पेंग्विन डिक्शनरी ऑफ रिलिजन्स)*

✿✿

आर्थिक

# देशोदेशींचे बोलके 'जेन्डर बजेट'

'जेन्डर बजेट' ही संकल्पना ऑस्ट्रेलिया, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, ब्रिटन, श्रीलंका, भारत, दक्षिण आफ्रिका, बार्बाडोस, केनिया, टांझानिया, लॅटिन अमेरिकेतील ब्राझील, इक्वेडोर, पेरू, अर्जेन्टिना, बोलिव्हिया आणि अगदी अलीकडे उत्तर आफ्रिकेतील मोरोक्को (डिसेंबर २००५) अशा काही देशांनी स्वीकारली आहे. या संकल्पनेचा विविध देशांनी व्यवहारात कसा उपयोग केला आहे आणि त्याचे काय फायदे झाले आहेत, हे जाणून घेण्याचा हा एक प्रयत्न.

**दक्षिण आफ्रिके**तील सरकारने 'जेन्डर बजेट'ऐवजी 'विमेन्स बजेट' असा शब्दप्रयोग स्वीकारला आहे. तेथील सरकारने आखलेल्या अर्थसंकल्पात 'नॅशनल पब्लिक वर्क्स प्रोग्रॅम'साठी १९९४पासून ३५ कोटी रँड (दक्षिण आफ्रिकेचे चलन) एवढा निधी राखून ठेवला होता. यापैकी २५ कोटी रँड एवढा निधी विविध समाजगटांना देण्यात येणार होता. काही प्रांतांनी आपल्या अंदाजपत्रकातील निधीची भर त्यात घातली होती. नऊ प्रांतांमधील भौगोलिक परिस्थिती व गरिबीचे तुलनात्मक चित्र लक्षात घेऊन एकंदर ५९९ प्रकल्प या योजनेतंर्गत हाती घेण्यात आले होते. १९९७मध्ये या प्रकल्पांची हिशेबतपासणी (ऑडिट) 'जेन्डर बजेट'च्या तत्त्वानुसार करण्यात आली. या तपासणीद्वारे असे आढळले की, जगभरात अशी जी काही कामे चालतात त्यांच्या तुलनेत या प्रकल्पांद्वारे निर्माण करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेचा दर्जा अधिक चांगला होता. या अंतर्गत ज्यांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला होता त्यात ४१ टक्के स्त्रिया व १२ टक्के युवक होते. ग्रामीण भागातील महिलांचे एकंदर लोकसंख्येत जे प्रमाण होते त्या प्रमाणापेक्षा कमी संधी महिलांना या प्रकल्पांमध्ये मिळाली होती. मात्र, 'जेन्डर बजेट' मान्य केले असल्याने व त्या विषयी थोडीफार

***• जेन्डर बजेट म्हणजे काय आणि जेन्डर बजेटची पूर्वतयारी, याबाबतचे माहितीपर दोन लेख 'अर्थबोधपत्रिके'च्या अनुक्रमे जानेवारी व फेब्रुवारी २००६च्या अंकांमध्ये दिलेले आहेत.***

जागरुकता निर्माण झाल्याने अशा कामांवर महिलांना रोजगार उपलब्ध होण्याच्या प्रमाणांत पूर्वीपेक्षा आता सुधारणा दिसत होती. या तपासणीतून असेही आढळले की, पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना मुळातच हलक्या स्वरूपाची कामे देण्यात आली होती, त्यांना देण्यात येणारी मजुरीही कमी होती. तसेच त्यांना कमी कालावधीसाठी रोजगार उपलब्ध करून देण्यात येत होता. प्रशिक्षणाच्या संधीही महिलांना कमी मिळाल्या होत्या. रोजगार उपलब्ध झालेल्या स्त्री-पुरुषांपैकी, ३७ टक्के पुरुषांना तर ३२ टक्के स्त्रियांना प्रशिक्षण मिळाले होते. या मूल्यमापनामुळे संबंधित विभागाला आपला उपक्रम अधिक नेटकेपणाने लाभार्थीपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न पुढील काळात करता आला.

**ब्रिटन**मध्ये बेरोजगार युवांसाठी 'न्यू डील प्रोग्रॅम' आखण्यात आला होता. नोकऱ्यांच्या बाजारपेठेत ज्यांना पगारी नोकरी मिळालेली नाही आणि जे 'काम करण्यायोग्य' ('वर्किंग एज' - म्हणजे नेमका कोणता वयोगट ते मात्र स्पष्ट करण्यात आलेले नाही) या गटात मोडतात, त्या व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळावा, असे अपेक्षित होते. सरकारच्या शिक्षण व रोजगार विभागाने सादर केलेल्या आकडेवारीनुसार बेरोजगार युवा नागरिकांसाठी राबविलेल्या योजनेत एकूणांत २७ टक्के स्त्रिया होत्या. 'दीर्घकालीन बेरोजगार' या गटात मोडणाऱ्या स्त्रियांची टक्केवारी १६ होती. 'एकटे पालक' (सिंगल पेरेन्ट्स्) या गटातील लाभार्थीपैकी ९५ टक्के लाभार्थी पालक या महिल्या होत्या.

या योजनेच्या खर्चाची तपासणी 'विमेन्स बजेट ग्रुप'च्या कॅथेरिन रेक यांनी केली. त्यांना असे आढळले की, 'न्यू डील प्रोग्रॅम'मधील ५७ टक्के निधी युवांसाठी वापरला गेला, २३ टक्के निधी हा 'दीर्घकालीन बेरोजगार' या गटातील व्यक्तींसाठी उपयोगात आणला गेला तर फक्त ८ टक्के निधी हा 'एकटे पालक' या गटासाठी वापरला गेला. उरलेला निधी इतर काही छोट्या योजनांसाठी वापरला गेला. 'एकटे पालक' या गटातील व्यक्तींमागे जेवढा निधी खर्च करण्यात आला, त्याच्या दुप्पट निधी युवा गटात मोडणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमागे खर्च करण्यात आला, असे कॅथेरिन रेक यांनी म्हटले आहे. याचा अर्थ, ज्या गटात स्त्रियांची संख्या लक्षणीय होती त्या गटासाठी जास्त निधी खर्च झालेला नव्हता. इतकेच नव्हे तर लाभार्थीवर झालेल्या दरडोई खर्चातही विविध गटांत विषमता होती. म्हणजेच या योजनेचा लाभ स्त्रियांना समानतेच्या तत्त्वावर मिळू शकलेला नाही, असे दिसते.

'जेन्डर बजेट'नुसार **श्रीलंके**त केलेल्या तपासणीतून असे निदर्शनास आले की, मुख्य सेवाक्षेत्रांचा विचार करता स्त्री व पुरुष दोघांमध्येही समानता आहे.

शिक्षणक्षेत्राबाबत असे आढळले की, सरकारने केलेल्या एकूण खर्चापैकी ४८ टक्के खर्चाचा लाभ स्त्रियांना झालेला आहे. आरोग्यक्षेत्रातील ५६ टक्के खर्चाचा व सामाजिक सेवांच्या क्षेत्रातील ५७ टक्के खर्चाचा लाभ स्त्रियांना झालेला आहे. मात्र काही विषयांबाबत स्त्री-पुरुष समानता राबविली गेलेली नाही, असेही आढळले. उदाहरणार्थ, दैनंदिन जीवनमानाबाबत वा पुनर्वसनाबाबत केला गेलेला खर्च. कृषी व उद्योग मंत्रालयांशी संबंधित काही योजनांची तपासणी करण्यात आली असता असे आढळले की, या दोन क्षेत्रांबाबत सरकारने राबविलेल्या योजनांपासून स्त्रियांना काही प्रमाणात दूरच ठेवण्यात आले आहे; वा काही ना काही कारणांनी त्या दूर राहिल्या आहेत. तसेच या क्षेत्रांत त्यांचा सहभागही अल्पच राहिला आहे. म्हणजे या दोन क्षेत्रांमधील योजनांचे परिणाम लिंगनिरपेक्ष (जेन्डर न्यूट्रल) असतील असे मानले गेले होते वा वरवर पाहता तरी तसे वाटत होते; पण प्रत्यक्षात मात्र तसे घडत नव्हते. त्यामुळे या धोरणांची नव्याने मांडणी करण्याची गरज असल्याचे संबंधितांच्या लक्षात आले.

अर्थसंकल्पातील निधी स्त्रियांसाठी किती व कसा खर्च केला जातो हे तपासणे ही 'जेन्डर बजेट'या संकल्पनेची एक बाजू झाली. 'जेन्डर सेन्सिटिव्ह बजेट'या संकल्पनेची तामिली होत असताना स्त्रियांच्या क्षमतांचा विकास होणे, विविध अधिकार मिळून त्यांचा अवलंब त्यांना करता येणे (empowerment) हे अपेक्षित आहे. तसेच कालांतराने अर्थसंकल्पाच्या जडणघडणीत महिलांचा वा महिला संघटनांच्या प्रतिनिधींचा सक्रिय सहभागही अपेक्षित आहे. त्यामुळे या 'एम्पॉवरमेन्ट'साठी किती व कसा खर्च केला जातो, ही 'जेन्डर बजेट'च्या संकल्पानुसारी मूल्यमापनाची दुसरी बाजू होय. आता अशी काही उदाहरणे पाहू.

**दक्षिण आफ्रिके**त १९९५ साली वीस वर्षावरील २० टक्के महिला व १४ टक्के पुरुष हे औपचारिक शालेय शिक्षणापासून वंचित राहिले होते. सुमारे ७४ लाख नागरिक अशिक्षित होते, त्यांपैकी ४० लाख महिला होत्या. 'अबेट' नामक (ABET - ॲडल्ट बेसिक एज्युकेशन ॲंड ट्रेनिंग) योजनेचा लाभ मिळणाऱ्या नागरिकांची संख्या तीन लाखांच्या आसपास होती (१९९४). या नागरिकांपैकी २९ नागरिक हे सरकारतर्फे चालविण्यात येणाऱ्या प्रौढ शिक्षणविषयक उपक्रमात सहभागी झालेले होते आणि त्यातील बहुतांश या महिला होत्या (५९ टक्के महिला व ४१ टक्के पुरुष). सरकारने शिक्षणासाठी जो एकंदर निधी राखून ठेवला होता त्यातील फक्त १ टक्का निधी या उपक्रमासाठी मंजूर केला होता. म्हणजे स्त्रियांच्या

'एम्पॉवरमेन्ट'साठी त्यांना शिक्षण मिळणे गरजेचे असताना आणि या शिक्षणाच्या उपक्रमात महिलांचा मोठा सहभाग असतानाही त्या उपक्रमासाठी निधी मात्र अल्पच होता. 'अबेट' ही योजना एका स्वयंसेवी संस्थेने पुढे आणली होती. या योजनेद्वारे तीस लाख नागरिकांना पाच वर्षांत शिक्षित करण्याचे उद्दिष्ट संस्थेने पुढे ठेवले होते. या योजनेसाठी पहिल्या वर्षी १३ कोटी २० लाख रँड इतका निधी घोषित करण्यात आला होता. मात्र, त्या वर्षी या योजनेची अंमलबजावणी झालीच नाही!

**बार्बाडोस**मध्ये १९९२ ते १९९६ या काळात छळ वा जीवास भीती निर्माण होत असल्याच्या एकूण ७६४ तक्रारी संबंधित यंत्रणेकडे करण्यात आल्या व सरकारकडून संरक्षण मिळावे अशी मागणीही करण्यात आली. यांपैकी ७३० तक्रारी महिलांनी केलेल्या होत्या. या महिलांवरील अन्याय-अत्याचार रोखण्यासाठी त्यांना तातडीने निवारा उपलब्ध करून देण्याची गरज होती. महिलांच्या एका स्वयंसेवी संस्थेने पुढाकार घेतल्याने संबंधित मंत्रालयाने काही निधी त्या स्वयंसेवी संस्थेला उपलब्ध करून दिला. नोव्हेंबर १९९९पासून सरकारी निवाऱ्याची सोय महिलांसाठी उपलब्ध झाली. पण ही सोय मिळविण्यासाठी अन्यायग्रस्त महिलांना बरीच रक्कम भरावी लागत होती. त्या महिला ही रक्कम भरू शकत नव्हत्या. तसेच, अन्यायपीडित महिलांच्या सुरक्षेसाठी त्या निवाऱ्यात अधिक तरतूदी करण्याच्या दृष्टीने काही बांधकाम करणे अगत्याचे होते. त्यासाठी आणखी निधीची मागणी स्वयंसेवी संस्थेतर्फे करण्यात आली. पण सरकारने संस्थेला निधी उपलब्ध करून दिला नाही. त्याशिवाय, सरकार व स्वयंसेवी संस्था यांच्यात या उपक्रमासाठी नियमित निधी उपलब्ध करून देण्याबाबतचा करार हा दरवर्षी नव्याने करण्याचा प्रस्ताव होता; त्या करारातील तरतूदीदेखील दरवर्षी नव्याने आखण्यात येणार होत्या. त्यामुळे कराराबाबतची, त्यातील तरतूदींबाबतची अनिश्चितता कायम होती. त्यामुळे अन्यायग्रस्त महिलांचे प्रश्न सुरळीतपणे सुटण्यास अडथळ्यांची शर्यतच पार करावी लागत होती, असे चित्र यांतून तयार झाले.

अर्थसंकल्पाचे विश्लेषण 'जेन्डर बजेट'नुसार करण्याप्रमाणेच सरकारच्या एखाद्या आर्थिक निर्णयाचे परिणाम स्त्रियांवर कसे होऊ शकतात, याचाही विचार नियोजनाच्या पहिल्या टप्प्यातच करायला हवा. उदाहरणार्थ, **ऑस्ट्रेलिया**तील दळणवळण उद्योगासाठी लागणाऱ्या साधनसामग्रीविषयक कारखान्यांमध्ये प्रामुख्याने स्त्रिया काम करीत आहेत. पण इतरत्र असते त्याप्रमाणेच तेथेही 'अकुशल कामगार' या वर्गवारीत असलेल्या स्त्रियांची संख्याच जास्त आहे. तांत्रिक व व्यवस्थापनविषयक कामांमध्ये

स्त्रियांचा सहभाग अल्पसाच राहिला आहे. या उद्योगासाठी सरकारने आर्थिक तरतूद केली तेव्हा या उद्योगाच्या विकासासाठी एक सर्वसमावेशक योजना आखण्यात आली, त्यामुळे तंत्रज्ञानाचा अधिक वापर होऊन अकुशल कामगारांची संख्या कमी होणे हे अपेक्षित होते. त्याबरोबरच तंत्रज्ञान, व्यवस्थापन, संशोधन व विकास आणि विक्री या ठिकाणी नोकऱ्यांच्या संधी वाढणे हेही अपेक्षित होते. स्त्रियांच्या नोकऱ्या जाऊ नयेत आणि त्याच वेळी त्यांना नवीन नोकऱ्यांच्या संधी उपलब्ध व्हाव्यात म्हणून या संबंधीचे सर्व शिक्षण, प्रशिक्षण या योजनेतंर्गत स्त्रियांना देणे शक्य होणार नव्हतेच. मात्र, त्याचबरोबर शिक्षण विभागातर्फे 'अफर्मेटिव्ह ॲक्शन' अंतर्गत स्त्रियांना विज्ञान-संशोधन व तंत्रज्ञानविषयक शिक्षण, मार्गदर्शन यांसाठी विशेष प्रयत्न केले जाऊ शकले तर स्त्रियांवर या योजनेचा होणारा अनिष्ट परिणाम टाळता येणे शक्य आहे. म्हणजे 'जेन्डर बजेट'च्या संकल्पनेचे भान असले तर तांत्रिक बदलांचे समाजाच्या विशिष्ट घटकांवर होणारे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन त्यानुसार नियोजनाच्या प्रक्रियेतच अशा विपरित परिणामांवरील उतारा गुंफता येतो. तसेच भविष्यकाळातील उपाययोजनेची दिशाही ठरविता येते, हे स्पष्ट होते.

**भारतात**देखील अर्थसंकल्पाचे विश्लेषण 'जेन्डर बजेट'नुसार करण्याचे सूतोवाच अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी केले आहे. यासाठीची पूर्वतयारी अद्याप चालू आहे. भविष्यातील अर्थसंकल्पांमध्ये याबाबत स्पष्टता होईल असा अंदाज आहे.

अर्थसंकल्पाचे विश्लेषण 'जेन्डर बजेट'नुसार करताना दोन मार्गदर्शक तत्वे विचारात घेतली जातात. एक म्हणजे, व्यक्ती तसेच कुटुंब या दोन्हींवरील परिणाम लक्षात घेतले जातात वा तसे ते लक्षात घेतले जाणे अपेक्षित आहे. म्हणजे, गरीब वा श्रीमंत कुटुंबांवर सरकारच्या एखाद्या तरतूदीचे परिणाम वेगवेगळे होत असतील तर ते तसे नोंदविले पाहिजेत. तसेच त्या त्या कुटुंबांमधील स्त्रियांवर व पुरुषांवर त्याचे होणारे वेगवेगळे परिणामही लक्षात घेणे अपेक्षित आहे. दुसरे म्हणजे, एखाद्या देशाने विकासाच्या संदर्भातील आपली उद्दिष्टे गाठली आहेत किंवा नाही हे केवळ पगारी श्रमांवरून ठरत नाही; तर, ज्या कामांसाठी पैसा दिला जात नाही/मागितला जात नाही असे बिनपगारी कामही त्या वेळी विचारांत घेणे अपेक्षित आहे. कुटुंबातील व्यक्तींनी आबालवृद्धांची, परस्परांची वा शेजाऱ्यांची काळजी घेण्यासाठी घालविलेला वेळ तसेच त्यांना मनोरंजनासाठी मिळणारा रिकामा वेळ, ही याची दोन उदाहरणे. घरातील व्यक्तींची

*(पान ३९ वर पाहावे)*

राजकीय

# भारताचे भवितव्य: एकात्मिक चिंतन

आर्थिक सुधारणांच्या तामिलीस गेल्या दशकात प्रारंभ झाल्यानंतर त्या सुधारणांच्या विविध पैलूंवर आणि एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेसंदर्भात भरपूर वाङ्मयनिर्मिती झाली. बहुतेक लिखाणांत या सुधारणांच्या एका, काही किंवा सर्व आर्थिक पैलूंचाच विचार झाला; पण, आर्थिक पैलूंबरोबरच भारतातले राजकारण आणि प्रशासन अशा तिन्हींचाही एकत्रित असा विचार मात्र झालेला आढळत नाही. विमल जालान यांच्या 'द फ्युचर ऑफ इंडिया - पॉलिटिक्स, इकॉनॉमिक्स अँड गव्हर्नन्स' या नव्या पुस्तकाने मात्र ही उणीव भरून काढली आहे. विमल जालान यांनी नियोजन आयोग तसेच वित्त व उद्योग मंत्रालयांमध्ये वरिष्ठ पदांवर अनेक वर्षे काम केले आहे. १९९७ ते २००३ या काळात ते भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते. भारतीय अर्थ व प्रशासनव्यवस्था त्यांनी अतिशय जवळून पाहिली-अनुभवली आहे. त्यांच्या या बहुआयामी कामगिरीची उचित दखल घेऊन राष्ट्रपतींनी त्यांची राज्यसभेचे सभासद म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या या पुस्तकातील मूलगामी विचारांचा काहीसा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

१९९१ सालच्या आर्थिक संकटानंतर दरडोई उत्पन्न, विदेशी चलनाची गंगाजळी अशा अनेक बाबतींमध्ये भारतीय अर्थकारणात लक्षवेधी सुधारणा घडून आली. चीनचा अपवाद वगळता, इतक्या वेगाने विकसित होणारे राष्ट्र जगात दुसरे नव्हते. त्यानंतर, आता नजीकच्या भविष्यात भारत आर्थिक संकटात सापडण्याची शक्यता नाही... आर्थिक वाढीचा वार्षिक सरासरी दर ७.५ ते ८ टक्के राखणे आता अशक्य असणार नाही... लोकसंख्येच्या वाढीचा दर कमी झाल्याने दरडोई उत्पन्नातील वार्षिक वाढ सरासरी ६ टक्के किंवा त्याहीपेक्षा जास्त असू शकेल... आणि याचा परिणाम म्हणून भविष्यात दारिद्र्य, भूक, कुपोषण, निरक्षरता अशा अनेक गोष्टींवर नियंत्रण ठेवता येईल...अशा प्रकारचा आशावाद व्यक्त केला जाऊ लागला. आजही व्यक्त केला जात आहे. पण....या आशावादाला काही अतिशय स्पष्ट अशा मर्यादाही आहेत, त्यांचेही भान ठेवणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणांचा पुऱ्या दशकभराचा प्रवास, विदेशी चलनाची मोठी गंगाजळी, माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नेत्रदीपक प्रगती, भांडवलाची

प्रचंड प्रमाणात वाढलेली जागतिक गतिशीलता अशा नानाविध आघाड्यांवर अनुकूलता लाभूनही भारताला दरवर्षी सरासरी सहा टक्क्यांपेक्षा अधिक वेगाने दौड मारता आलेली नाही, ही बाब नजरेआड करता येणार नाही. वलयांकित, ख्यातकीर्त राजकीय पुढारी, आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता पावलेले अर्थतज्ज्ञ, पोलादी पकडीचे प्रशासन अशी बहुविध अनुकूलता केवळ आजच नाही तर यापूर्वीही गाठीशी असूनही आपल्या आर्थिक विकासाचा पल्ला व वेग हा निर्धारित उद्दिष्टाच्या भोज्याला कधीच शिवू शकला नाही. हे असे का घडले?..जालान यांचे या संदर्भातील अनुभवसिद्ध निरीक्षण असे आहे की, राष्ट्रातील प्रचलित राजकीय आणि प्रशासकीय वास्तवाचे पुरेसे भान ठेवले नाही तर मोठ्या आर्थिक यशाची खात्री देता येत नाही, म्हणजेच देशाचे राजकारण, अर्थकारण आणि प्रशासन यांचा एकत्रित विचार करण्याला पर्याय नसतो. याशिवाय, राष्ट्राच्या सीमांबाहेरील परिस्थितीचाही परिणाम राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर होत असतो. तिचाही विचार हा या संदर्भात अटळ असतो.

गेल्या काही दशकांमध्ये भारताच्या देशान्तर्गत राजकीय/आर्थिक परिस्थितीत तर मोठी परिवर्तने झाली आहेतच; पण जागतिक परिस्थितीही खूपच बदलली आहे. या सगळ्याच बदलांचे भान ठेवून, त्यांच्याशी सुसंगत होतील असे बदल आपल्या राजकारणात, अर्थकारणात आणि प्रशासनात घडवून आणणे ही बाब आता टाळता येण्यासारखी नाही. असे परिवर्तन साकारले तरच भारताच्या आर्थिक भवितव्याविषयी वर व्यक्त केलेला आशावाद वास्तवात उतरू शकेल. विमल जालान यांनी त्यांच्या पुस्तकात या विषयाचा संक्षिप्त आढावा तर घेतला आहेच; पण सद्यःस्थितीही कमालीच्या नेटकेपणाने मांडली आहे. या तीनही आघाड्यांवरील दोषांची ओळख वाचकांना करून देतानाच, भारताचे आशावादी भवितव्य वास्तवात उतरविण्यासाठी या तीनही क्षेत्रांमध्ये काय काय करायला पाहिजे, कशा प्रकारच्या सुधारणा घडून येणे अत्यावश्यक आहे, याचे मार्गदर्शनही त्यांनी केले आहे.

**क्षेत्र राजकारणाचे**

आपले अवघेच समाजजीवन हे या ना त्या प्रकारे राजकीय व्यवस्थेशी जोडलेले असते. परिणामी, या व्यवस्थेची गुणवत्ता ही अर्थकारणासह एकंदरच सर्व क्षेत्रांच्या कामगिरीचा पोत ठरविण्यात निर्णायक भूमिका बजावते. भारतासारख्या लोकशाहीप्रधान देशात, जालान यांच्या मते म्हणूनच, राजकीय व्यवस्थेचा तोंडवळा निश्चित करणाऱ्या निवडणूक प्रक्रियेची कार्यक्षमता व शुचिता ही महत्त्वाची ठरते.

भारताचा निवडणूक आयोग स्वायत्त असून त्याच्या निरीक्षणाखाली देशातल्या निवडणुका मुक्त आणि बव्हंशी निकोप, खुल्या वातावरणात पार पडतात. पण एकदा निवडणूक पार पडली आणि नव्या सरकारने सत्ता ग्रहण केली की मग मात्र सरकारच 'सर्व'सत्ताधारी होऊन बसते. अशी सत्ता देशातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितापेक्षा वेगळे असे 'विशेष' हित जपायला लागते. भ्रष्टाचाराची लागण, नीतिमत्तेचा ऱ्हास आणि देशासमोरील सर्वच बाबींचा विचार हा संकुचित अशा पक्षीय राजकारणाच्या भूमिकेतून करण्याच्या मानसिकतेमुळे राजकीय नेते हे नागरिकांचे हित जपण्याच्याबाबतीत सक्षम राहू शकत नाहीत. लोकशाहीतील 'सुजाण नागरिक' या संदर्भात फारशी काही सुधारणा करायला पुढे सरसावत नाहीत (किंवा अशा सुधारणा करण्याचा प्रयत्न असफल ठरण्याची भीतीच त्यांना जास्त वाटत असावी). तर, अशिक्षित/अल्पशिक्षित नागरिक हे त्यांच्याठयीच्या शैक्षणिक अभावापायी फारसे काही करू शकत नाहीत.

या परिस्थितीत सर्वच पक्षांना आणि त्यांच्या नेतृत्वाला धर्म, जात, प्रदेश यांसारख्या संकुचित घटकांचा वापर आपल्या तात्कालिक राजकीय स्वार्थासाठी करणे शक्य होते. अर्थात, शिक्षणाच्या प्रचलित पातळीत वाढ झाली तरी भारतातील धर्म, जात यांसारख्या बाबींचे महत्त्व लक्षणीयरीत्या कमी होईल, असे नाही; पण मतदार निदान थोडेसे अधिक जागरूक तरी होऊ शकतील. सर्वसाधारण शैक्षणिक विकास-विस्ताराच्या बरोबरीनेच राजकीय क्षेत्रात अन्य काही बदलही आवश्यक आहेत; एक म्हणजे राजकारणाची अर्थकारणातली आजमितीची भूमिका कमी होणे अगत्याचे आहे. अर्थात, धोरणविषयक बाबींमध्ये अंतिम निर्णय घेणे राजकीय नेतृत्वाच्या हाती असणे स्वाभाविक आहे, पण त्यानंतर निर्णयाची अंमलबजावणी मात्र व्यावसायिक प्रशासकांकडेच सोपवली गेली पाहिजे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर धोरणांच्या अंमलबजावणीत सरकारचा हस्तक्षेप नसावा, जालान यांनी राजकीय क्षेत्रात सुचविलेल्या इतर सुधारणाही विचार करायला लावणाऱ्या आहेत.

- ज्या पक्षाचे लोकनियुक्त सभासद हे एकूणांत दहा टक्क्यांपेक्षा कमी आहेत, असे पक्ष जोपर्यंत स्वतःचा सवतासुभा बाजूस ठेवून पुढच्या निवडणुकीपर्यंत एखाद्या प्रमुख पक्षाचे सहकारी/संलग्न पक्ष म्हणून राजकीय व्यवस्थेत नांदण्यास तयार नसतील तोपर्यंत त्यांना सरकारमध्ये सहभागी होण्याची परवानगी नसावी;
- आघाडी सरकारमधील सर्वात मोठ्या असणाऱ्या पक्षालाही (त्याच्या निवडणूकपूर्व भागीदारांसह) काही किमान जागा निवडणूकीत जिंकण्याबाबतची अट घालणे आवश्यक

आहे. असे केल्यास, निवडणुकीच्या जाहीरनाम्यात त्या पक्षाने (वा/तसेच त्याच्या आघाडीतील मित्रपक्षांनी) मतदारांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याची संधी संबंधित सरकारला मिळू शकेल;

- लोकसभेच्या सभापतींचे आणि राज्यसभेच्या अध्यक्षांचे अधिकार बळकट करणेही गरजेचे आहे; त्यामुळे दोन्ही सभागृहांचे कामकाज अधिक शिस्तबद्ध पद्धतीने होऊ शकेल. २६ ऑगस्ट २००४ रोजी लोकसभेत प्रश्नोत्तराचा तास तहकूब केला जाऊन ४ लाख ७० हजार कोटी रुपयांच्या खर्चाचे अंदाजपत्रक चर्चेविनाच अवघ्या काही मिनिटांमध्येच संमत होण्याच्या घटनेची पुनरावृत्ती त्यामुळे भविष्यात तरी होणार नाही. जोपर्यंत सभागृहाचे कामकाज पूर्ण होऊन अधिकृतरीत्या नोंदविले जात नाही तोपर्यंत कोणतेही सभागृह आठवड्यांतून दोनपेक्षा अधिक वेळा तहकूब केले जाऊ नये; तसेच सभागृहांच्या नेत्यांना आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांना, दोन व्यक्ती प्रतोद (व्हिप) म्हणून नेमण्याचा अधिकार असावा; या व्यक्तींनी त्यांच्या सभासदांना संबंधित सभागृहाच्या कामकाजात अडथळे आणण्यापासून परावृत्त करण्याची जबाबदारी स्वीकारावी. त्यामुळे दोन्ही सभागृहांमधील कामकाजावर प्रचंड प्रमाणात होणाऱ्या खर्चाचा दुरुपयोग टळू शकेल.

अर्थात, भारताच्या राजकारणाच्या संदर्भात आपण सुचविलेल्या सुधारणा सौम्य वाटत असल्या तरी त्यांचा स्वीकार आणि त्याहीपेक्षा त्यांची अंमलबजावणी होणे सोपे नाही, याची जालान यांना जाणीव आहे.

### अर्थकारणाच्या विश्वात

भारताच्या अर्थकारणात सुरुवातीपासूनच असलेली कामकाजविषयक क्लिष्टता आणि प्रशासकीय ढिलाई सर्वश्रुतच आहे. पण गंमत अशी की याच दुर्गुणांचा ज्यांना दीर्घकाळ लाभ होत राहिला त्यांना तीच व्यवस्था कायम राहावी; अर्थकारणावरची पूर्वीची केंद्रीभूत पकडच चिरंतन राहावी असे अगदी मनापासून वाटते. असे वाटण्यात फक्त संघटित कामगार व नोकरवर्गच नाही तर खुद्द राजकीय नेतेही आहेत. नोकरीची हमी आणि प्रशासनाच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर असणाऱ्या भ्रष्टाचाराच्या भरपूर संधी यांच्यामुळे प्रस्थापित परिस्थितीत बदल होऊच नयेत, अशीच सर्वांची इच्छा होती. मात्र जेव्हा बाह्य परिस्थितीच्या रेट्यामुळे हे बदल अटळच होऊन बसले, तेव्हा मग या अशा अनिवार्य ठरलेल्या बदलांची गती मंद कशी राहील आणि राजकीयदृष्ट्या ते जास्तीतजास्त वादग्रस्त कसे ठेवता येतील, याचाच विचार अधिक केला गेला.

सार्वजनिक सेवा तसेच सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांची कार्यक्षमता सुधारणे हा असाच एक चिरंतन प्रश्न आहे. या संदर्भात जालान यांनी सुचविलेला उपाय असा की विविध सेवांची मालकी आणि त्यांचे वितरण यांच्यात भेद करावा. म्हणजे सेवांची मालकी सरकारकडेच ठेवावी, पण त्यांच्या वितरणाची जबाबदारी मात्र स्थानिक, खाजगी संस्थांवर सोपवावी म्हणजे त्यांच्या उपलब्धतेत, गुणवत्तेत, वित्तीय कामगिरीत एकूणच सुधारणा होऊ शकेल. जागतिक अनुभवही असाच आहे.

या अवघ्या पार्श्वभूमीवर, जालान यांच्या मते एक गोष्ट मात्र मान्य केलीच पाहिजे आणि ती म्हणजे अलीकडच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेत आलेला आत्मविश्वास. १९९०च्या दशकात चालू झालेली आर्थिक सुधारणांची प्रक्रिया हे तर या आत्मविश्वासाचे एक कारण आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे वेगवेगळ्या राष्ट्रांच्या तुलनात्मक लाभांचे स्रोत आता बदलायला लागले आहेत. उत्पादनतंत्र, आंतरराष्ट्रीय व्यापार, भांडवल-परिचालन, कुशल कामगारांची नेमणूक इत्यादींबाबत भारतासारखी राष्ट्रे पूर्वी फारसा लाभ उठवू शकत नव्हती; पण आता मात्र भारतासारखी फारच थोडी राष्ट्रे असा लाभ उठवू शकतात. या अनुकूलतेबरोबरच अनेक वस्तू-सेवांचे उत्पादन स्पर्धात्मक किंमतींमध्ये करण्यासाठी जे तंत्रज्ञान व कौशल्य आवश्यक आहे तेही आता भारताजवळ आहे. हे सारे असले तरी भविष्याकडे पाहण्याची आपली दृष्टी आणि आर्थिक व्यूहरचना या दोन्हीतही आवश्यक असणारे बदल आपण केले तरच आपल्यामध्ये आलेल्या या क्षमतांची फळे आपल्या हाती प्रत्यक्षात पडू शकतील, असा इशाराही जालान देतात.

**प्रश्न प्रशासनाचा**

भारताचे भवितव्य साकारण्यात प्रशासनाची भूमिकाही महत्त्वाची आहे. देशाच्या प्रशासनात शासकीय सेवा आणि मंत्री यांच्या भूमिका महत्त्वाच्या असतात. यापैकी शासकीय सेवांमध्ये दोन स्तर असतात - उच्च आणि कनिष्ठ. उच्च स्तरावर असणाऱ्या शासकीय सेवकांच्या बदल्या देशभर कोणत्याही खात्यात होणाऱ्या असतात. त्यामुळे त्यांना शिक्षण/निवास इत्यादींबाबतूत सतत अडचणीच सहन कराव्या लागतात. शिवाय, अशा बदल्या संबंधित मंत्र्यांच्या लहरीनुसार, थोडासाच अवधी देऊन आणि बहुधा वारंवार होणाऱ्या असतात. अशा बदल्या टाळण्यासाठी मग हे सनदी अधिकारी, मंत्र्यांच्या इच्छा (कितीही असमर्थनीय असल्या तरी) सांभाळण्यातच गर्क असतात. त्यांना चांगल्या, विधायक कामासाठी मिळणारा वेळ अपुरा असतो. कदाचित, अशा

अनेक कारणांमुळेच सरकारी/सार्वजनिक क्षेत्रातल्या वरच्या श्रेणींच्या नोकऱ्यांमधले पूर्वीचे आकर्षण आज दिसत नाही. याबाबत जालान यांचे मत असे आहे की वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या बाबतीत काही मूलभूत व पारदर्शक नियम बनवले पाहिजेत; मंत्री आणि सनदी अधिकारी यांच्या अधिकारांचेही सुस्पष्ट विभाजन केले पाहिजे; तसेच या अधिकाऱ्यांना स्वयंनिर्णयासाठी जादा अधिकारही मिळाले पाहिजेत - अर्थात, अशा जादा अधिकारांबरोबरच त्यांनी जादा दायित्वही स्वीकारले पाहिजे. कनिष्ठ स्तरावरच्या नोकऱ्या बहुधा बदली न होणाऱ्या आणि वाढती नुकसान भरपाई मिळणाऱ्या असतात; म्हणून अशा नोकऱ्यांचे आकर्षण तुलनेने मोठे असते.

मंत्र्यांच्या संदर्भात असे म्हणता येईल की, सरकारच्या विविध योजना, कार्यक्रम, कायदे इत्यादींमध्ये गेल्या काही दशकांमध्ये बरीच वाढ झाली. त्यामुळे मंत्री, मंत्रालये, खाती यांचीही संख्या वाढली आणि या वाढीबरोबरच त्यांच्या दरम्यान असणारे सहकार्यच कमी झाले असे नाही; तर प्रत्यक्षात अन्तर्विरोधच वाढला. परिणामतः प्रशासनाची व्याप्ती वाढली, पण दर्जा मात्र खालावला. शिवाय राष्ट्र, राज्य अशा दोन्ही पातळ्यांवर आता आघाडी सरकारेच यायला लागल्याने, मंत्र्यांचा कार्यकाळही पूर्वीसारखा दीर्घ राहण्याची शक्यता कमी झाली; साहजिकच, त्यांच्यातली दायित्वाची भावनाही कमी झाली; आणि याची सर्वात मोठी झळ, सार्वजनिक सेवांवरच प्रामुख्याने अवलंबून असणाऱ्या गरीब वर्गाला बसली. उत्साहाच्या भरात मंत्री योजना जाहीर करून टाकतात; पण योजनांच्या वाईट कामगिरीला मात्र ते जबाबदार नसतात! निर्णय त्यांचेच असूनही फलिताची जबाबदारी मात्र त्याची नसते! म्हणून जालान असे सुचवितात की, ग्रामीण विकास, प्राथमिक शिक्षण, रोजगार, पायाभूत साधने यासारख्या सार्वजनिक कार्यक्रमांच्या बाबतीत 'सामूहिक' जबाबदारीची जागा 'वैयक्तिक' जबाबदारीने घ्यायला पाहिजे.

**पाश भ्रष्टाचाराचा**

भ्रष्टाचाराच्या संदर्भात केल्या गेलेल्या प्रत्यक्ष क्षेत्रीय संशोधनाचा एक निष्कर्ष असा आहे की त्याचा अतिशय वाईट परिणाम लघुउद्योग आणि रोजगारनिर्मिती यांच्यावर होतो. प्रशासनातील अनिष्ट प्रवृत्तींपासून होणारा मानसिक त्रास टाळण्यासाठी लघुउद्योगांना जी लाच देणे भाग पडते ती लाच हा एक प्रकारचा खर्चच गणावयास हवा. अशा 'खर्चा'मुळे उत्पादकता व उत्पादन यांच्यात तर वाढ होत नाहीच; पण नफ्याची पातळी मात्र कमी होते. भ्रष्टाचार हा नुसताच खूप व्यापक नाही तर तो खूप

खोलवर रुजलेलाही आहे; आणि म्हणूनच तो कमी करण्यासाठी बहुआयामी/ चहूबाजूच्या उपायांची गरज आहे. भ्रष्टाचाराची मागणी व त्याचा पुरवठा कमी करण्यासाठी काही व्यूहरचना करण्याबरोबरच, काही संस्थात्मक स्वरूपाचे बदल करणेही गरजेचे आहे, असे जालान यांचे मत आहे. भ्रष्टाचाराच्या मागणीच्या बाजूला 'किरकोळ मागणी' आणि 'ठोक मागणी' असे दोन प्रकार आहेत; अगदी सामान्य जीवन जगण्यासाठीही काही कायदेशीर परवानग्यांची गरज असते आणि त्यासाठी सामान्य लोकही पैसे द्यायला तयार असतात. हा झाला 'किरकोळ' प्रकार. तसेच, नाना प्रकारचे प्रतिबंधात्मक कायदेकानू, किंमत-नियंत्रण अशा गोष्टींपासून स्वतःचा लाभ वाढविण्याची इच्छा असणाऱ्या स्वार्थी कंपन्या आणि व्यवसायही पैसे देण्यास तयार असतात - हा 'ठोक' भाग. आर्थिक सुधारणांमधल्या उदारीकरणामुळे, यापैकी भ्रष्टाचाराच्या मागणीचा 'ठोक' भाग काहीसा कमी झाला आहे; पण विविध परवान्यांच्या अस्तित्वामुळे तो अजूनही मोठा आहेच. हे दोन्ही प्रकार कमी करण्यासाठी जालान यांनी काही उपाय सुचविले आहेत:

•नागरिकांना द्यावे लागणारे परवाने, परवानग्या इत्यादी गोष्टी संबंधित खात्याने न करता त्या 'बाहेरून' करवून (आउटसोर्सिंग) घ्याव्यात. यामुळे 'किरकोळ' भ्रष्टाचार कमी होईल. •प्रशासकीय पद्धतींचे सुलभीकरण, क्लिअरन्स देणाऱ्या संस्थांच्या संख्येतील घट - यांसारख्या उपायांमुळे 'ठोक' भ्रष्टाचारही कमी होण्यास मदत होईल. •प्रशासकीय क्लिष्टता आणि राजकीय विशेषाधिकार कमी करता आल्यास इतर गोष्टी सुकर होऊ शकतील. •सरकारी/सार्वजनिक क्षेत्रातल्या नोकरांना मिळणारे विशेष संरक्षण (काही अपवाद वगळता) पूर्णपणे काढून घेतल्यासही भ्रष्टाचारास पायबंद बसू शकेल. •केंद्र व राज्य पातळ्यांवर भ्रष्टाचाराचा शोध घेणाऱ्या/शिक्षा करणाऱ्या अनेल संस्था आहेत; पण त्यांच्यापुढे अनेक प्रकरणे सततच प्रलंबित असतात. दोषींना शिक्षा होण्याचे प्रसंग विरळाच असतात. म्हणून भ्रष्टाचाराचा शोध घेणाऱ्या संस्थांची संख्या कमी करणे - हाही एक महत्त्वाचा संस्थात्मक बदल म्हटला पाहिजे. काहीही निष्पन्न न होणाऱ्या अनेक प्रकरणांपेक्षा, अतिशय कडक शिक्षा होऊ शकेल, अशा काही मोजक्याच प्रकरणांचा पाठपुरावा करणेही परिणामकारक ठरेल.

या पुस्तकात जालान यांनी सुचविलेले उपाय चिंतनीय व अवलंबनीय आहेत. भारताला आर्थिकदृष्ट्या बळकट व्हायचे असल्यास अशा एकात्मिक चिंतनामधून निर्माण होणाऱ्या कृतीची गरज आहे!

पर्यावरण

# (झगमगणाऱ्या) दिव्यांखाली अंधार....

उन्हाळा आला की वेध लागतात ते कैरीच्या चटकदार फोडींचे, मधुर पन्ह्याचे, उसाच्या आणि आंब्याच्या गोड रसाचे, स्वादिष्ट आणि रवाळ 'पॉट आइस्क्रीम'चे तसेच अंगणात/ गच्चीत झोपण्याचेही. दिवसभर उन्हात पोळलेल्या धरतीवर संध्याकाळी पाणी टाकून थंडावा निर्माण करायचा, रात्री आंथरूणपांघरूणाची सोय करायची, मग आकाशातील चमचमते, लुकलुकते तारे बघत निद्राधीन (चित्रपटप्रेमींसाठी 'स्वदेस'मधील 'ये तारा, वो तारा हर तारा' असे गुणगुणत) व्हायचे आणि भल्या पहाटे पक्ष्यांच्या किलबिलाटाने जागे व्हायचे, हे सुख काही न्यारेच! पण काळ बदलला, तसेच समाजजीवनही. फ्लॅट संस्कृती पसरलेल्या वाढत्या शहरांमध्ये अनेक नवनव्या सुखसोयी उपलब्ध झाल्या तर अंगणात/गच्चीत झोपण्यासारखी लहानसहान सुखे दुर्मिळ झाली. बेलगाम वाढणाऱ्या या शहरांमध्ये रात्र असते ती वाहनांची, प्रचंड गर्दीची आणि झगमगणाऱ्या दिव्यांची. मग दिव्यांच्या प्रकाशात मध्यरात्रही जागविणाऱ्या शहरांमध्ये आकाशातील चमचमणारे तारे आठवतात आणि दिसतात तरी कुणाला? अलीकडे मात्र या झगमगणाऱ्या दिव्यांबाबत - कृत्रिम प्रकाशाबाबत - काही वेगळी माहिती पुढे आली आहे. या दिव्यांमुळे शहरी माणसांचे जीवन तात्पुरते उजळले गेले असले तरी त्यामुळे पक्षी, प्राणी, झाडे आणि खुद्द मानवाच्या जीवनात अंधारयुग येत आहे. दिव्यांच्या झगमगाटामुळे होणारे प्रदूषण पक्ष्यांच्या, मानवाच्या निसर्गचक्रावर उलटले आहे. आकाशप्रेमी संशोधकांनी केलेल्या संशोधनांतून हे सत्य समजू शकले आहे.

'कॅम्पेन फॉर डार्क स्काइझ्'चे ब्रिटनमधील संयोजक बॉब मिझॉन यांच्या मते रात्रीचे आकाश हे त्याच्या नैसर्गिक सौंदर्यासाठी तर मनमोहक आहेच; पण विज्ञानविषयक अभ्यास करणाऱ्यांसाठी ते विशेष कुतूहलाचे तसेच महत्त्वाचे आहे. पण अनेक देशांमध्ये ऊर्जेचा तुटवडा असतानाही, वाढत्या शहरीकरणामुळे दिव्यांचा झगमगाट दिवसेंदिवस वाढतोच आहे. माणसांकडूनच रात्रीचे आकाश हिरावले जात आहे. त्यांच्या एका सहकाऱ्यांच्या मते हे आकाश हिरावले जाणे हा, जगातील 'सर्वात मोठ्या उद्याना'चा तोटा आहे. विशेषतः, विकसित देशांचे हे फार मोठे नुकसान आहे.

'ब्रिटिश ॲस्ट्रॉनॉमिकल असोसिएशन' आणि 'कॅम्पेन फॉर द प्रोटेक्शन ऑफ रूरल इंग्लंड' यांनी केलेल्या संशोधनानुसार ब्रिटनमधील ८५ टक्के नागरिक हे कृत्रिम प्रकाशाचा वापर जास्त असलेल्या ठिकाणी वास्तव्यास आहेत आणि गेल्या काही वर्षांमध्ये या कृत्रिम प्रकाशामुळे होणाऱ्या प्रदूषणात १७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. कृत्रिम प्रकाश वाढणे याचा अर्थ रात्रीचे आकाशदर्शन दुर्मिळ होत जाणे (भारतातील पुणे, मुंबई अशा मोठ्या शहरांमध्येही ग्रहताऱ्यांच्या निरीक्षणासाठी शहराबाहेर जाणे इष्ट ठरताना दिसते). हे प्रदूषण एवढे वाढले आहे की, गेल्या काही दशकांत आकाशनिरीक्षणासाठी तयार करण्यात आलेले टेलिस्कोप (उदाहरणार्थ, लॉसएंजेलिसजवळील माउंट विल्सन येथील तसेच हवेइ व्होल्कॅनिक माउना के येथील टेलिस्कोप) आता खगोलशास्त्रज्ञांना तेवढे उपयुक्त ठरताना दिसत नाहीत. रात्रीचे आकाश नीट न्याहाळता न येणे ही एक बाब झाली; पण त्याहून गंभीर बाब म्हणजे कृत्रिम प्रकाशामुळे मानवी जीवन, पक्षीजगत यांच्यासह अनेक परिसंस्था (ecosystems) धोक्यात आल्या आहेत, ही होय.

**निसर्गात ढवळाढवळ**

सृष्टिचक्र व मानवी जीवन हे दिवस (प्रकाश) व रात्र (अंधार) या दोन भागांत विभागले गेले आहे. दिवस व रात्रीच्या या नैसर्गिक चक्राला जैविक ताल (circadian rhythms) असे म्हटले जाते. अगदी सूक्ष्म अशा बॅक्टेरियाच्या चलनवलनापासून ते मानवी जीवनातील खाण्यापिण्याच्या, अन्नपचनाच्या आणि इतर शारीरिक क्रिया या जैविक तालामुळे घडून येत असतात. सूर्य उगवला की अन्नाच्या शोधात भटकायचे आणि सूर्य मावळला की आपापल्या घरट्यांत परतायचे हे पक्ष्यांचे जीवन आपल्याला माहिती आहे. झाडेझुडुपे आणि इतर प्राण्यांच्या दैनंदिन क्रियाही या जैविक तालाप्रमाणे होत असतात. फक्त आधुनिक मानवाच्या जीवनपद्धतीत सूर्य मावळला आणि अंधाराचे साम्राज्य चालू झाले की कृत्रिम प्रकाशाचा वापर चालू होतो. त्यामुळे काय होते ? तर मानवाप्रमाणे प्राणी, पक्षी, झाडे यांचे निसर्गचक्रदेखील बदलते.

ब्रिटनमधील एका खेड्यात जास्त क्षमतेचे नवीन दिवे रस्त्यांवर बसविले तेव्हा पहिल्या दिवशी तेथील पक्ष्यांना अंधार झाल्याचे कळलेच नाही आणि ते बराच काळ गात, चिवचिवत जागे राहिले. प्रखर प्रकाशामुळे त्यांच्यासाठी दुसऱ्या दिवशीची पहाटही लवकर झाली. असे वारंवार घडू शकते, किंबहुना घडत असते. अशा वेळी पक्ष्यांच्या झोपेचा प्रकार फक्त बदलतो असे नाही. रात्री पुरेशी झोप न झाल्याने ते दिवसभर तेवढे उत्साही राहू शकत नाहीत. त्यामुळे त्यांच्या अन्न मिळविण्याच्या क्षमतेवर परिणाम

होतो, पर्यायाने त्यांचे आरोग्य बिघडते. आणखी एक घातक परिणाम असा होतो की, शहरांतील उंच इमारतींमधील घरांच्या खिडक्यांमधून परावर्तित होणाऱ्या प्रकाशामुळे अनेक पक्षी खिडक्यांच्या तावदानांना धडकून मृत्युमुखी पडतात. याशिवाय स्थलांतर करणारे पक्षीदेखील मैलोगणती अंतर कापताना स्वतःच्या तसेच सभोवतालच्या निसर्गचक्रावर अवलंबून असतात. सूर्याच्या मावळण्याच्या वेळेनुसार त्यांचा जैविक ताल बदलता असतो.

समुद्री कासवांमधील माद्या अंडी घालण्यासाठी अॅटलांटिक समुद्रापासून कॅरिबियन बेटांवरील समुद्रकिनाऱ्यापर्यंतचे मोठे अंतर पार करतात; कारण, या किनारपट्टीवर अंड्यांमधील पिलांची वाढ उत्तम होते. हौशी पर्यटकांची संख्या वाढत असल्याने ही किनारपट्टी दिव्यांच्या झोतात न्हाऊन निघाली आणि इकडे कासवांच्या माद्यांनी किनारपट्टीवर येण्याचे नाकारले. तरीही ज्या माद्यांनी अंडी घातली त्यांची पिले अंड्यांमधून बाहेर आल्यानंतर कृत्रिम प्रकाशामुळे समुद्राच्या दिशेने न जाता दिशा चुकण्याचीच शक्यता अधिक होती. आता या संदर्भात तेथील नागरिकांमध्येच केवळ नव्हे तर, पर्यटकांमध्येही जागरुकता निर्माण झाल्याने तेथे दिव्यांचा प्रकाश मंद ठेवण्यात येत आहे. किनाऱ्यावरील दिवे मंद ठेवल्यानंतरही असे आढळले की, किनाऱ्यानजीक झालेल्या नागरी विकासामुळे तेथील आकाशात रात्रीच्या वेळी पसरलेल्या प्रकाशामुळेदेखील कासवांची पिले समुद्रापर्यंत पोचू शकली नाहीत. या संदर्भात फ्लोरिडा येथील पर्यावरण रक्षण विभागाने असे नोंदवून ठेवले आहे की, १९९८मध्ये किनाऱ्यावरील दिव्यांबाबत कडक नियमांची अंमलबजावणी केली असतानाही १९ हजार ९७० कासवांच्या पिलांना समुद्राकडे जाण्याची वाट सापडली नाही. वाट चुकल्यामुळे त्यांना इतर प्राणी-पक्षी यांचे भक्ष्य व्हावे लागले. या प्रकारातून वाचून जी पिले कशीबशी समुद्रापर्यंत पोचली त्यांच्यात पोहण्याचे त्राणच उरले नव्हते.

सोनकिडे, घुबडे, उंदीर, वटवाघळे, डंग बीटल्स आणि मासे यांच्याबाबतही असेच काहीसे घडते. बी.बी.सी.च्या एका कार्यक्रमामध्ये अशी माहिती देण्यात आली होती की, बहुतांश पक्षी सूर्य, चंद्र, तारका यांच्या खुणांनी आपला प्रवासमार्ग ठरवितात. पण आफ्रिकेतील डंग बीटल्सचा मार्ग एकदम अनोखा आहे. चंद्राची प्रकाशकिरणे पृथ्वीच्या वातावरणातील सूक्ष्म कणांना स्पर्शिली जातात तेव्हा वातावरणात एक वेगळा 'पॅटर्न' तयार होतो. हा 'पॅटर्न' समजून घेऊन डंग बीटल्स सरळ रेषेत प्रवास करतात. ढगाळ हवामान असताना त्यांच्या प्रवासात अनियमितता येते आणि ते

गोलाकार मार्गाने प्रवास करतात. कृत्रिम प्रकाशामुळे सोनकिड्यांना आपल्या साथीदारांचे चमकणे समजून येत नाही. काही विशिष्ट माशांनाही प्रकाशाचा त्रास होतो.

प्राणीजीवनाशिवाय काही वनस्पती, झाडे यांचे निसर्गचक्रही बदलत असल्याचे आढळले आहे. तळी, डबकी यांच्या पृष्ठभागांवरील हिरव्या वनस्पतींपासून मोठ्या वृक्षांपर्यंत सर्वांची एक विशिष्ट अशी परिसंस्था असते. कृत्रिम प्रकाशाला सामोरे गेल्यानंतर काहींचे पानगळीचे चक्र बदलते, काही झाडांचे फळाफुलांचे व अन्ननिर्मितीचे चक्र बदलू शकते. अशा रीतीने संपूर्ण परिसरविज्ञान व त्यातील अनेकानेक घटक या परिणामांमध्ये खेचले जातात. त्यामुळे निसर्गचक्र अडचणीत येते.

## मानवी जीवनावरही गंभीर परिणाम

आजच्या संगणकीय युगात, आपल्याला आश्चर्य वाटेल पण, कृत्रिम प्रकाशाचे मानवी जीवनावरही होणारे परिणामही गंभीर आहेत. दिवसा काम करणे व रात्री झोप घेणे हे निसर्गचक्र मानवाला साधारणपणे मानवते. दिव्यांच्या प्रखर प्रकाशामुळे माणसांच्या झोपेत व्यत्यय येतो. छळ म्हणून वा गुन्हा कबूल करावा म्हणून तुरुंगातील कैद्यांच्या डोळ्यांवर प्रखर प्रकाशझोत सोडण्यात येतात हे सर्वश्रुत आहेच. माणसांबाबत एक लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, घराबाहेरच्या कृत्रिम प्रकाशाबरोबरच घरांमधील कृत्रिम प्रकाशही माणसाला हानिकारक ठरतो. या प्रकाशात अधिक काळ काम करणाऱ्यांमध्ये कॅन्सर होण्याची शक्यता वाढते. मानवी मेंदूत - पिनियल ग्लँडमध्ये - मेलाटोनिन हे संप्रेरक (हॉर्मोन) अंधार पडल्यानंतर तयार होत असते. त्याच्या प्रभावामुळे माणसांची वाटचाल झोपेकडे होत जाते. पहाट होऊ लागली की मेलाटोनिनचे रूपांतर सिरोटोनिनमध्ये होते आणि त्याच्या प्रभावाने जागे होण्याची क्रिया घडून येते. शरीरातील इतर संप्रेरकांच्या कार्यात बदल घडवून आणण्याचे कार्य या दोहोंमुळे होत असते. मेलाटोनिन तयार होण्याचे प्रमाण कमी झाल्यास स्तनांचा कर्करोग होण्याच्या शक्यता वाढतात, असे काही संशोधकांचे म्हणणे आहे. या विषयावर २००३ मध्ये फिलाडेल्फिया येथे झालेल्या परिषदेत टॉमस जेफरसन युनिव्हर्सिटीचे डॉ. जॉर्ज ब्रेनार्ड यांनी असे निरीक्षण सादर केले की, रात्रीच्या कृत्रिम प्रकाशामुळे स्तनांचा कर्करोग होऊ शकतो, असे संशोधनांमधून आढळत आहे. विकसित देशांसाठी ही बाब गांभिर्याने घ्यावी अशीच आहे.

लहान मुलांवरही कृत्रिम प्रकाशाचा वाईट परिणाम होतो. दिवे चालू ठेवून झोपणाऱ्या मुलांमध्ये मोठे झाल्यावर ऱ्हस्व दृष्टीचा (shortsightedness) त्रास

होण्याचे प्रमाण अधिक असते, असे आढळले. 'स्लीप ॲसेसमेन्ट ॲंड ॲडव्हायझरी सर्व्हिस'चे संचालक डॉ. ख्रिस इडिकोवस्की म्हणतात की, रात्री दिवे चालू असतील तर झोपेत व्यत्यय येतोच शिवाय मुले अधिकच चंचल व अस्थिर होऊ शकतात. या सर्वांमुळे मुलांचे आरोग्य खालावते. काही अभ्यासकांचे म्हणणे असे आहे की पांढऱ्या 'फ्लुरोसंट ट्यूबलाइट'पेक्षा नैसर्गिक प्रकाश हा अधिक चांगला पर्याय आहे. याचा वापर करणाऱ्या मुलांमधील ताण कमी होतो, त्यांचा रक्तदाब योग्य असतो, तसेच त्यांच्यातील चंचलता कमी होते. नैसर्गिक प्रकाशाचा वापर थांबवून पांढऱ्या 'फ्लुरोसंट ट्यूबलाइट'चा वापर पुन्हा चालू केला की मुलांमधील ताण परत वाढतो. नैसर्गिक प्रकाशामुळे रक्तदाब कमी होतो, कोलेस्टेरॉलची पातळी कमी होते आणि शरीरातील संप्रेरकांची पातळीही स्थिर राहण्यास मदत होते हे माहिती असूनही नैसर्गिक प्रकाशाचा उपयोग केला जात नाही, असे आढळते. उलट सूर्यप्रकाशामुळे त्वचेची हानी होते, त्यामुळे त्वचेचा कर्करोग होतो असा समज समाजात आढळतो. पण नेमके याच्या उलट वृत्त ब्रिटनमधील 'लान्सेट' या प्रसिद्ध नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहे. पांढऱ्या 'फ्लुरोसंट ट्यूबलाइट'मध्ये जास्त वेळ काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये त्वचेचा कर्करोग होण्याचे प्रमाण अधिक आढळते, असे एक निरीक्षणवजा अनुमान त्यात मांडण्यात आले आहे. दिवस व रात्रीचे चक्र जेथे नैसर्गिकरीत्याच समान नाही अशा देशांबाबतही एक वेगळीच माहिती पुढे आली आहे. उदाहरणार्थ, उत्तर युरोपीय देशांमधील नागरिकांमध्ये 'सिझनल अफेक्टिव्ह डिसऑर्डर' (SAD) या नावाची एक व्याधी आढळून येते. ऋतुमानानुसार येणारे नैराश्य, असे याला म्हणता येईल.

कृत्रिम प्रकाशाबाबत अशी माहिती पुढे येत असतानाही ब्रिटनमध्ये एक नवीनच 'फॅड' अलीकडे पसरताना दिसते. सुरक्षेसाठी घराचा कोपरान्‌कोपरा प्रकाशित झालेला असावा म्हणून तेथे 'होम सिक्युरिटी लायटिंग'चा अवलंब करण्यात येत आहे. मात्र काही देश याबाबत आता जागरुक बनले असून कृत्रिम प्रकाशासंदर्भात त्यांनी काही उपाययोजना केली आहे. अमेरिकेतील ॲरिझोना प्रांतातील फ्लॅगस्टफ, इटलीतील लॉम्बार्डी येथे आणि चेकोस्लोव्हाकिया या संपूर्ण देशात दिव्यांचा वापर कमी करण्याचे ठरविण्यात आले आहे. कृत्रिम प्रकाशाच्या वाढत्या वापराविरोधातील ही जागृती विजेचा तुटवडा जाणवणाऱ्या भारतासारख्या देशास उपकारकच ठरावी!

*(संदर्भ - द इकॉलॉजिस्ट - नोव्हेंबर २००५, वेबसाइट - www.darksky.org)*

## आर्थिक

# अर्थसंकल्पाचा वाटाड्या

पूर्वी कधी नव्हती एवढी आर्थिक साक्षरतेची निकड आज वाढलेली आहे. इच्छा असो अथवा नसो, पण नानाविध आर्थिक तसेच वित्तीय बाबी, संकल्पना आज आपल्या अंगावर चोहोकडून आदळत असतात. वृत्तपत्रादी प्रसारमाध्यमांमधूनही त्यामुळे साहजिकच आर्थिक वा वित्तीय विषयांच्या चर्चा-मंथनास अधिकाधिक महत्त्व मिळू लागल्याचे आपण सारेच अनुभवतो आहोत. छापील तसेच दृकश्राव्य माध्यमांमधून या अशा तांत्रिक विषयांची विश्लेषणे वारंवार सामोरी येऊ लागल्याने तर किमान आर्थिक साक्षरतेची भूक अधिकाधिकच प्रज्ज्वलित होत आहे. या ना त्या रूपात शेअर बाजारासारख्या संस्थेतही सर्वसामान्यांचा वाढता सहभाग दिसतो. उदारीकरणाचे वारे घोंघावत आहेतच. या नवीन प्रणालीला, संस्कृतीला सकारण वा अकारण विरोध करावयाचा अथवा पाठिंबा द्यावयाचा तरी आर्थिक घडामोडींसंदर्भात काही किमान ज्ञान व माहिती आपल्या पदरी असावी, अशी गरज समाजातील विविध स्तरांमध्ये आता हळूहळू मुखर होऊ लागली आहे. भारतीय अर्थकारणात गेली सुमारे १५ वर्षे सुरू असणाऱ्या आर्थिक सुधारणांच्या या प्रक्रियेस आपला प्रतिसाद आज कसा आहे, तो कशा प्रकारचा असला पाहिजे, या बदलांचे आपल्या व्यक्तिगत तसेच सामूहिक जीवनावर कशा प्रकारचे परिणाम संभवतात यासारख्या प्रश्नांची उत्तरे आपली आपण शोधण्यासाठीही अशा आर्थिक साक्षरतेची खचितच मदत होईल.

मार्च महिन्याचे नामकरण 'बजेटचा महिना' असे करावयास कोणाचीही हरकत असू नये. ज्याच्याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागलेले असते असा केंद्र सरकारचा अर्थसंकल्प याच महिन्यात संसदेला सादर होतो. त्यानंतर लगोलग देशभरातील राज्यांचे अर्थसंकल्प त्या त्या राज्याच्या विधानसभेसमोर मांडले जातात. एकूणच,जवळपास हा सारा महिना 'अर्थसंकल्प' हाच एक विषय आपल्या साऱ्यांच्या विचारविश्वाचा एक मोठा भाग व्यापून दशांगुळे वर उरलेला असतो. म्हणूनच, या महिन्यात तर अर्थसंकल्पविषयक आर्थिक साक्षरतेची जरूरी विशेषत्त्वानेच भासते. ही गरज ध्यानात घेऊन अर्थसंकल्पाशी संबंधित अशा विविध संकल्पांची एक सार्थ सूची या ठिकाणी

सादर केली आहे. अर्थसंकल्पाचे विवरण वाचता-ऐकताना ज्या वेगवेगळ्या संज्ञा-संकल्पना आपल्या कानावर पडत असतात, त्यांचे अर्थशास्त्रीयदृष्ट्या नेमके अर्थ बरेच वेळा पटकन ध्यानात येत नाहीत. विवरण करणारे तज्ज्ञ अशा संज्ञाचा वापर भराभर करत असतात. विविध स्तरांवर आयोजित केल्या जाणाऱ्या चर्चा-परिसंवादांमध्ये अनेक वेळा अनवधानाने काही संज्ञा या समानार्थक म्हणून (interchangeably)योजल्या जातात. त्या संज्ञांच्या ठायी असणारे श्लेष अशा वेळी नजरेआड होण्याची शक्यता असते. त्यामुळे नेमका अर्थ प्रतीत होण्यात अडचणी येतात. या ठिकाणी दिलेल्या संकल्पना सूचीची मदत त्याबाबतीत होईल अशी आशा आहे. परिणामी, अर्थसंकल्पाबाबतचे इतरांचे कडूगोड, अनुकूल वा प्रतिकूल अभिप्राय वाचत अगर ऐकत असतानाच, त्याबाबत आपल्यालाही आपले मत बनविता येऊ शकेल. निदान तसा प्रयत्न करण्यासाठी एक सामग्री तरी हाताशी राहील.

'अर्थसंकल्प' म्हटले की आपल्या डोळ्यासमोर येतो तो केवळ केंद्रीय अर्थसंकल्प. पण तसे नाही. केंद्रापाठोपाठच असतो राज्य सरकारचा अर्थसंकल्प. याही पलीकडे एक स्तर आहे आणि तो म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांचा. जिल्हा परिषदेसह त्रिस्तरीय पंचायत राज्य संस्था आणि नगरपालिका व महानगरपालिकेसारख्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्था या सगळ्यांनाच अर्थसंकल्प हा सादर करावाच लागतो. आपले लक्ष या तिसऱ्या स्तराकडे अभावानेच जाते. अर्थसंकल्पाशी संलग्न अशा ज्या विविध संज्ञा या ठिकाणी दिलेल्या आहेत त्या तशा सर्वत्र लागू होणाऱ्या आहेत (उदाहरणार्थ प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कर, महसूली खर्च, भांडवली खर्च, महसूली तूट इत्यादी). अर्थात, एखादी बाब एखाद्या स्तरावर गैरलागूच असेल तर भाग वेगळा. अन्यथा, एखाद्या अर्थसंकल्पाचे अंतरंग जाणून घेताना ज्या संज्ञा-संकल्पनांची निकड भासते त्यांचा समावेश या सूचीमध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

'अर्थबोधपत्रिके'चा हा अंक हातात पडेपर्यंत केंद्र सरकारचा अर्थसंकल्प सादर होऊन जवळपास पंधरवडा लोटला असेल. तर, राज्याचा अर्थसंकल्प जवळपास तोंडावर आलेला असेल. यादृष्टीनेही ही संकल्पना सूची उपयुक्त ठरावी. केंद्र काय अथवा राज्य काय, कोणत्याही अर्थसंकल्पाकडे पाहत असताना, त्याच्या अर्थकारणातील विविध विभागांवरील संभाव्य परिणामांची चर्चा वा विश्लेषण करीत असताना काही बाबींचे भान ठेवणे हे आवश्यक ठरते. उदाहरणार्थ, अर्थसंकल्पीय चर्चांमध्ये 'योजनेंतर्गत खर्च' आणि 'योजनाबाह्य खर्च' या दोन संकल्पना वारंवार उपयोजिल्या जातात. (या

दोन्ही संज्ञांचे अर्थ सूचीत दिलेले आहेतच). योजनाबाह्य खर्चाचे सरकारच्या एकंदर खर्चातील प्रमाण वाढण्याबाबत विविध व्यासपीठांवर प्रसंगी चिंताही व्यक्त केली जाते. पण म्हणून सरसकट सर्वच योजनाबाह्य खर्च हा अनिष्ट, असे सरळ समीकरण मांडणे उचित ठरत नाही. यातील जो खर्च पूर्वीच्या पंचवार्षिक योजनांदरम्यान हाती घेण्यात आलेल्या वा पूर्ण झालेल्या प्रकल्पांच्या देखभाल-दुरुस्तीसाठी केला जातो तो आवश्यक आणि उपकारकच असतो. कारण, हा खर्च जर केला नाही तर त्या मालमत्तांची आवश्यक त्या देखभाल-दुरुस्तीअभावी आबाळ होऊन परिणामी त्यांच्या उत्पादकतेस हानी पोहोचते. अशा मालमत्तांचे आयुष्यही घटते. अनेक मालमत्ता वा सुविधा या निकामी होण्याचाही धोका संभवतो. असे झाले तर अशा निकामी झालेल्या मालमत्तांच्या निर्मितीवरील भांडवली खर्चही एका परीने वायाच जातो. म्हणूनच, पूर्वीच्या योजनांमध्ये निर्माण करण्यात आलेल्या भांडवली मालमत्तेच्या, सुविधांच्या मरम्मतीखातर केला गेलेला खर्च तांत्रिकदृष्ट्या जरी नवीन योजनेमध्ये 'योजनाबाह्य खर्च' म्हणूनच दाखवला गेला तरी तो इष्ट खर्चच गणावयास हवा.

तीच बाब सरकारी खर्चाच्या 'विकासात्मक खर्च' **(Developmental Expenditure)** आणि 'विकासेतर खर्च' **(Non Developmental Expenditure)** या वर्गीकरणाची. सर्वसाधारणपणे, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला थेट पूरक ठरणाऱ्या, हातभार लावणाऱ्या, चालना देणाऱ्या खर्चाची गणना 'विकासात्मक खर्च' म्हणून केली जाते (उदाहरणार्थ वीजनिर्मिती, रस्तेबांधणी, शेती यांसारख्या बाबींवर होणारा खर्च). पण म्हणून नैसर्गिक आपत्तीचे बळी ठरलेल्यांचे पुनर्वसन, प्रशासन, संरक्षण, कायदा व सुव्यवस्था यांसारख्या बाबींवर होणारा आणि 'विकासेतर खर्च' म्हणून गणला जाणारा सरकारचा खर्च हा सरसकट अनिष्ट वा अनुत्पादक ठरविणे योग्य नाही. कारण अखेर आर्थिक विकासाची प्रक्रियाही गतिमान होते ती सर्वसाधारण शांती आणि सामाजिक स्थैर्याचा माहौल असेल तरच. अशी शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करून ती टिकविण्यासाठी आवश्यक असणारा खर्च हा विकासाच्या प्रक्रियेला पूरकच ठरतो.

अर्थसंकल्पांच्या विश्लेषणात, राज्यघटनेने केंद्र व राज्य या दोन स्तरांवर केलेले विविध विषयांचे वाटप वा वर्गीकरणही ध्यानात ठेवणे अगत्याचे आहे. शेती, आरोग्य यांसारखे विषय हे राज्य सूचीमध्ये समाविष्ट आहेत. म्हणजे, या बाबींसंदर्भातील महसूली तसेच भांडवली खर्चासाठी पुरेशा निधीची तरतूद करणे ही मुख्यतः राज्यांची

जबाबदारी आहे. अशा खर्चासाठी, प्रसंगी, राज्ये केंद्र सरकारकडून कर्जाऊनिधी घेऊ शकतात. ही सारी अवधाने बाळगून अर्थसंकल्पांकडे पाहताना पुढील संकल्पना सूची खचितच उपयुक्त ठरावी:

# संकल्पना सूची

(१) **Consolidated Fund of India: भारताचा एकत्रीकृत निधी :** केंद्र सरकारची संपूर्ण प्राप्ती अथवा केंद्र सरकारकडे विविध स्त्रोतांद्वारे जमा होणारे उत्पन्न एकत्रित केले जाऊन जो निधी तयार होतो तो निधी. नावामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे हा निधी केंद्राच्या पातळीवर तयार होतो. असाच निधी राज्य पातळीवरही तयार होतो. त्या त्या राज्याच्या नावाने तो निधी ओळखला जातो (उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्याच्या एकत्रीकृत निधीचे संबोधन **'महाराष्ट्राचा एकत्रीकृत निधी'**). राज्य सरकारला विविध स्त्रोतांद्वारे मिळणारे उत्पन्न/निधी एकत्रित होऊन हा निधी तयार होतो. केंद्र सरकारच्या पातळीवर संसदेची तर राज्यांच्या पातळीवर त्या त्या राज्याच्या विधानमंडळांची अधिमान्यता मिळाल्याखेरीज सरकारला या निधीमधून खर्च करता येत नाही.

(२) **Revenue Receipts: महसूली प्राप्ती अथवा महसूली जमा :** विविध प्रकारच्या चालू (current) जमा. यांत पुढील जमांचा समावेश होतो:

२.१ कर तसेच शुल्कांच्या आकारणीद्वारे जमा होणारा महसूल

२.२ सरकारने दिलेल्या कर्जांवर सरकारला मिळालेले व्याज

२.३ सरकारने केलेल्या गुंतवणूकीवर मिळालेला लाभांश

२.४ सरकारला विविध सेवांवरील सेवाशुल्कांद्वारे (फी) मिळालेले उत्पन्न

२.५ सरकारकडे देणगीरूपाने आलेला पैसा

महसूली प्राप्ती म्हणजे सरकारचे उत्पन्न. सरकारला याद्वारे खर्चासाठी पैसा मिळतो. महसूली जमेच्या माध्यमातून सरकारच्या खात्यावर कोणतेही दायित्व वा देणे वा भार तयार होत नाही.

(३) **Capital Receipts: भांडवली प्राप्ती अथवा भांडवली जमा :** ज्या जमेद्वारे सरकारच्या खात्यावर दायित्व तयार होते अशा सर्व जमा. यांत खालील बाबींचा समावेश होतो:

३.१ सरकारने बाजारातून उभारलेली कर्जे (देशी कर्जे)

३.२ परदेशी सरकारे वा संस्थांकडून घेतलेली कर्जे (विदेशी कर्जे)

३.३ पूर्वी दिलेल्या कर्जांची वसुली वा परतफेडीच्या रूपाने आलेली जमा

३.४ मालमत्ता विक्रीद्वारे जमा झालेला पैसा

३.५ अल्पबचतीच्या रूपाने सरकारी तिजोरीत जनतेने जमा केलेला पैसा

३.६ जनतेच्या भविष्यनिर्वाह निधीची रक्कम

(४) **Revenue Expenditure : महसूली खर्च** : ज्या खर्चाद्वारे सरकारच्या गाठी कोणत्याही प्रकारची भौतिक स्वरूपातील अथवा वित्तीय स्वरूपातील मालमत्ता तयार होत नाही, असा खर्च. या खर्चाचे घटक असे:

४.१ दैनंदिन कारभार चालविण्यासाठी येणारा खर्च: उदाहरणार्थ, सरकारी सेवकांचे वेतन व भत्ते, कार्यालयीन साहित्य खरेदी व अन्य

४.२ सरकारने घेतलेल्या कर्जांवरील व्याज

४.३ सरकारने दिलेली स्पष्ट वा व्यक्त (explicit) अनुदाने

४.४ सरकारतर्फे देण्यात आलेल्या देणग्या.

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ★ LIBRARY ★

(५) **Capital Expenditure: भांडवली खर्च वा भांडवली व्यय:** ज्या खर्चाद्वारे सरकारच्या गाठी कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील मालमत्ता (भौतिक/वस्तुरूप वा वित्तीय) तयार होते असा खर्च. या खर्चाचे घटक असे:

५.१ जमीनजुमला, इमारती, यंत्रसामग्री यांच्या खरेदी/संपादनावरील खर्च

५.२ समभागांमधील सरकारी गुंतवणूक

५.३ सरकारने दिलेली कर्जे

५.४ सरकारी लेखा खात्यातून अदा होणाऱ्या रकमा.

(६) **Plan Expenditure: नियोजन व्यय अथवा योजनेंतर्गत खर्च :** पंचवार्षिक विकासयोजनेत अंतर्भूत केलेल्या प्रकल्प, उपक्रम, योजना अथवा कार्यक्रमांवरील खर्च. या सर्व योजना या **नवीन** असतात.

(७) **Non-Plan Expenditure: योजनाबाह्य खर्च/व्यय :** योजनेत नव्याने समाविष्ट नसलेल्या बाबींवरील खर्च. पंचवार्षिक योजनेच्या कालावधीदरम्यान सरकार विविध प्रकल्प हाती घेते, कार्यान्वित करते. पूर्ण झालेल्या कामांवरील चालू खर्चासाठी नवीन अथवा पुढील योजनाकाळात खर्चाची जी तरतूद केली जाते तिचे वर्गीकरण त्या नवीन योजनेत 'योजनाबाह्य खर्च' म्हणून केले जाते. पूर्वीच्या योजनांमध्ये निर्माण करण्यात आलेल्या प्रकल्पांच्या देखभाल-दुरुस्तीवरील खर्च, हे योजनाबाह्य खर्चाचे उदाहरण.

(८) **GDP: Gross Domestic Product: स्थूल आंतर्देशीय उत्पादित अथवा ठोकळ देशी उत्पादन :** देशाच्या अर्थव्यवस्थेत एखाद्या विशिष्ट कालावधीदरम्यान उत्पादन करण्यात आलेल्या वस्तू तसेच सेवांच्या बाजारपेठीय किंमतीनुसार होणाऱ्या मूल्याची एकत्रित बेरीज. हा कालावधी सर्वसाधारणपणे एका वर्षाचा असतो. या मूल्यांकनात केवळ अंतिम निर्मित वस्तू तसेच सेवांचा समावेश असतो (ग्राहकांच्या उपभोगासाठी तयार असलेल्या वस्तू अथवा सेवांना 'अंतिम निर्मित वस्तू - Final Goods' असे म्हणतात. उत्पादिताच्या मोजमापादरम्यान द्विरुक्ती - **Double counting -** टाळण्यासाठी अशा वस्तू अगर सेवा तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाचे मूल्य ठोकळ देशी उत्पादनाच्या गणतीत वेगळे धरले जात नाही). यातील 'देशी' हा शब्द वस्तू अथवा सेवांच्या उत्पादनाचे भौगोलिक स्थान स्पष्ट करतो. देशाच्या भौगोलिक सीमांमध्ये तयार करण्यात आलेल्या वस्तू अगर सेवांचाच समावेश या मूल्यांकनात करण्यात येतो. देशांतर्गत समग्र वस्तू तसेच सेवांच्या वर्धित मूल्यांची बेरीज करून स्थूल आंतर्देशीय उत्पादिताचे मोजमाप करता येते.

(९) **Value Added: वर्धित मूल्यः** एखाद्या उद्योगाने तयार केलेल्या अंतिम मालाचे (वस्तू अगर सेवा) मूल्य आणि तो माल तयार करण्यासाठी वापरण्यात आलेल्या कच्च्या मालाचे, साधनसामग्रीचे मूल्य यांतील फरक. कच्चा माल, साधनसामग्री, उपकरणे इत्यादी बाहेरून विकत घेऊन उत्पादक त्याच्या वस्तूचे उत्पादन करतो व नंतर ती ग्राहकास विकतो. वस्तू उत्पादनाच्या या प्रक्रियेत तो मूळच्या कच्च्या मालावर काही प्रक्रिया करून त्यांचे रूपांतर अंतिम मालात करतो. म्हणजेच, उत्पादनाच्या या प्रक्रियेत कच्चा माल तसेच उपकरणांच्या मूळच्या मूल्यात भर पडून शेवटी अंतिम माल तयार होतो. हेच ते वर्धित मूल्य.

(१०) **Non-Tax Revenue: करेतर महसूल :** व्याज, लाभांश, देणगी, अनुदाने, भाडे यांसारख्या मार्गांनी सरकारी तिजोरीत जमा होणारा महसूल.

(११) **Direct Taxes: प्रत्यक्ष कर :** ज्या व्यक्ती अथवा उद्योगावर कर आकारलेला असतो त्याच व्यक्ती अथवा उद्योगाकडून त्या कराची वसुली प्रत्यक्षात होते, असे कर. प्राप्ती कर अथवा आय कर, कंपनी कर, धन अथवा मालमत्ता कर, भांडवली लाभ कर ही सारी प्रत्यक्ष कराची उदाहरणे. जी व्यक्ती कर भरण्यास कायदेशीररीत्या बांधील आहे तिच्याच खिशातून जेव्हा कराची वसुली होते तेव्हा त्या कराचा प्रत्यक्ष

भार ( incidence: अर्थशास्त्रीय परिभाषेत - कराचा आपात) त्या व्यक्तीवरच पडतो. हा भार ती व्यक्ती दुसऱ्याकडे हस्तांतरित करू शकत नाही.

(१२) **Indirect Taxes: अप्रत्यक्ष कर :** ज्या व्यक्ती अगर उद्योगघटकावर कर आकारलेला असतो ती व्यक्ती अगर उद्योग कराचा संपूर्ण अथवा काही भार दुसऱ्यावर ढकलू शकते, अशा करांना अप्रत्यक्ष कर म्हणतात. म्हणजेच, कराची आकारणी व प्रत्यक्षातील वसुली एकाच व्यक्तीकडून होतेच असे नाही. विक्री कर, अबकारी कर, सेवा कर ही सारी अप्रत्यक्ष कराची उदाहरणे. विक्री कर अथवा अबकारी कराचा भार उत्पादक अथवा दुकानदार किंमतीच्या माध्यमातून ग्राहकावर ढकलतो. कराचा 'आपात' ग्राहकांवर पडतो. विक्री कर अथवा अबकारी करासारख्या करांचा भरणा जरी संबंधित दुकानदार वा व्यापारी सरकारी तिजोरीत करीत असले तरी त्यांची वसुली मात्र ते ग्राहकांच्या खिशातून करतात.

(१३) **Personal Income Tax: प्राप्ती कर अथवा आय कर :** व्यक्तीच्या उत्पन्नावरील कर.

(१४) **Corporation Tax : निगम कर अथवा कंपनी कर :** कंपनी अगर उद्योगांच्या नफ्यावरील कर.

(१५) **Wealth Tax : धन अथवा मालमत्ता अथवा संपत्ती कर :** संपत्तीवर आकारला जाणारा कर.

(१६) **Gift Tax : दान कर :** भेट अथवा दानापोटी दिलेल्या रकमेवरील कर.

(१७) **Capital Gains Tax : भांडवली लाभ करः** मालमत्तेच्या मूल्यात झालेल्या वाढीवर आकारण्यात आलेला कर.

(१८) **Fringe Benefit Tax : आनुषंगी लाभ कर :** पगार, बोनस अथवा निवृत्तिवेतन यांव्यतिरिक्त कर्मचाऱ्यांना कंपनीकडून अथवा मालकाकडून मिळणाऱ्या लाभांवर आकारलेला कर. कंपनीने पुरविलेली वाहन सुविधा, आरोग्य सुविधा, कंपनीतर्फे करण्यात आलेली मोफत अथवा सवलतीच्या दरातील निवास व्यवस्था, बालसंगोपन व्यवस्था यांसारख्या लाभ तसेच सुविधांवरील कर.

(१९) **Securities Transaction Tax : रोखे खरेदी-विक्रीवरील कर**

(२०) **Cash Withdrawal Tax : बँकेतून पैसे काढण्यावर आकारलेला कर**

(२१) **Excise Duty : उत्पादन शुल्क अथवा अबकारी करः** वस्तूंवर आकारण्यात येणारा कर

(२२) **Customs : सीमा शुल्क** : परदेशातून आयात करण्यात आलेल्या मालावरील कर

(२३) **Service Tax : सेवा कर** : सेवेच्या मूल्यावर आकारण्यात आलेला कर. हा अप्रत्यक्ष कर आहे.

(२४) **Sales Tax : विक्री कर** : हा अप्रत्यक्ष कर आहे. व्यवसायांच्या विक्रीवर हा आकारला जातो.

(२५) **Value Added Tax (VAT) : वर्धित कर** : हा अप्रत्यक्ष कर आहे. वस्तू अथवा सेवांवर हा आकारला जातो. ती वस्तू अगर सेवा निर्माण करीत असताना उत्पादकाने उत्पादक घटकांच्या मूळ मूल्यात जी भर घातलेली असते त्या वाढीव मूल्यावर हा कर आकारला जातो.

(२६) **Personal Disposable Income : विनियोग्य उपन्न** : व्यक्तीला मिळालेले उत्पन्न तसेच त्याला मिळालेली अनुदाने यातून त्या व्यक्तीने देय असणारे सर्व कर तिने सरकारकडे भरल्यानंतर जे निव्वळ उत्पन्न विनियोगासाठी तिच्या खिशात उरते असे उत्पन्न. व्यक्तिगत विनियोग्य उत्पन्नाची बेरीज करून समग्र अर्थव्यवस्थेच्या पातळीवरील विनियोग्य उत्पन्नदेखील मोजता येते.

(२७) **Tax/GDP Ratio: कर - देशी ठोकळ उत्पादन गुणोत्तर** : कर महसूलाचे ठोकळ देशी उत्पादनाशी असणारे प्रमाण

(२८) **Cess: उपकर** : कराच्या मूळ दरावर आकारण्यात येणारा वेगळा वाढीव कर. बरेचदा काही विशिष्ट कारणांसाठी वाढीव महसूल गोळा करण्यासाठी सरकार असा उपकर आकारते. शिक्षण उपकर हे याचे एक उदाहरण. अशा उपकराद्वारे जमा झालेला महसूल तो उपकर ज्या कारणासाठी वा ज्या बाबींसाठी आकारण्यात आलेला आहे तिच्याखातर खर्च केला जातो. निदान तशी अपेक्षा तरी असते.

(२९) **Surcharge: अधिभार** : प्रचलित कर दरांच्या डोक्यावर अधिक दराने आकारण्यात आलेला वाढीव भार. नियमित आकाराच्या जोडीनेच वसूल करण्यात येणारा वाढीव, जास्तीचा आकार.

(३०) **Tax Base: कर आधार** : कराचा दर ज्यावर आकारून व्यक्ती अथवा उद्योगाकडून वसूल करावयाच्या कर महसूलाचे मोजमाप केले जाते तो कराचा आधार. उदाहरणार्थ, व्यक्तीला मिळणारे एकूण उत्पन्न हा प्राप्तीकराचा कर-आधार म्हणून गणले जाते.

(३१) **Subsidy: अनुदान** : सरकार जनतेला विविध प्रकारच्या सेवा पुरवीत असते. त्या सेवा निर्माण करण्यास तसेच पुरविण्यास सरकारला खर्च येतो. मात्र, अशा सेवांचा उपभोग घेणाऱ्यांकडून सरकार जेव्हा त्या सेवा पुरविण्यासाठी येणाऱ्या खर्चापेक्षा कमी सेवाशुल्क वसूल करते तेव्हा, सेवापुरवठ्याचा वास्तवातील खर्च व आकारण्यात आलेले सेवाशुल्क यातील फरकास अनुदान म्हणतात.

(३२) **Revenue Deficit: महसूली तूट** : सरकारची महसूली जमा व महसूली खर्च यांतील तफावत. सरकारचा चालू खर्चही कर तसेच करेतर महसूलातून भरून निघत नाही, अशी स्थिती.

(३३) **Fiscal Deficit: राजकोषीय तूट** : सरकारचा एकूण खर्च (महसूली व भांडवली) आणि सरकारची महसूली जमा व सरकारवरील कर्जभार न वाढविणाऱ्या ज्या भांडवली जमा सरकारी तिजोरीत येतात (उदाहरणार्थ, जुन्या कर्जांची वसुली, सरकारी मालमत्तेच्या विक्रीद्वारे मिळालेले उत्पन्न इत्यादी) त्या जमा यांतील तफावत म्हणजे राजकोषीय तूट. ही तूट भरून काढण्यासाठी सरकारला बाजारातून किंवा अल्पबचतीच्या अथवा अन्य माध्यमांतून कर्जउभारणी करावी लागते. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, निर्गुंतवणूकीद्वारे सरकारी तिजोरीत जमा झालेल्या निधीचा विनियोग तुटीचा खड्डा भरून काढण्यासाठी सरकारला करता येणार नाही.

(३४) **Primary Deficit : प्राथमिक तूट** : राजकोषीय तूटीमधून सरकारने पूर्वी घेतलेल्या कर्जांवरील देय असणारे व्याज वजा केल्यानंतर जी तूट उरते ती तूट.

(३५) **Gross Budgtetary Support to Plan: योजनांतर्गत खर्चास अर्थसंकल्पीय साहाय्य** : वार्षिक अर्थसंकल्प आणि वार्षिक योजना यांचा परस्परसंबंध दाखविणारी संकल्पना. केंद्र सरकारच्या वार्षिक योजनेत समाविष्ट असलेल्या योजना-उपक्रमांसाठी आवश्यक असलेल्या एकंदर निधीपैकी जो पैसा अथवा जो निधी केंद्रीय अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे पुरविला जातो तो निधी. उर्वरित निधी हा सार्वजनिक क्षेत्रातील, केंद्र सरकारच्या उपक्रमांनी निर्माण केलेल्या अंतर्गत निधीद्वारे उपलब्ध होतो.

(३६) **Non Performing Assets: थकित कर्जे अथवा बुडित कर्जे**

(३७) **Growth: आर्थिक घटकांमधील वाढ** : ठोकळ देशी उत्पादन, रोजगार, बचत, गुंतवणूक यांतील वाढ. अशी वाढ घडून येत असताना किंमत पातळी, व्याज दर, चलनपुरवठा यांसारख्या बाबींमध्ये लक्षणीय चढ-उतार, अस्थिरता अनुभवास येत नाही अशा अवस्थेस स्थैर्यपूर्ण वाढ (**Growth with stability**) असे म्हणतात.

तसेच, अशा आर्थिक वाढीदरम्यान अर्थकारणातील विषमता (उत्पन्न, मालमत्ता इत्यादी बाबतींतील) वाढत नसेल अथवा अस्तित्वात असलेली विषमता घटत जात असेल तर अशा आर्थिक वृद्धीस समन्यायी वाढ असे म्हणतात **(Growth with equity)**

(३८) **FDI : Foreign Direct Investment: परकीय थेट गुंतवणूक :** एका देशातील नागरिक अथवा कंपन्यांनी दुसऱ्या देशातील मालमत्तेच्या खरेदीद्वारे तेथे गुंतवणूक करणे. जमीनजुमला घेणे, दुसऱ्या देशात नव्याने कारखाना उभारणे किंवा दुसऱ्या देशातील कारखाना त्याच्या स्थावर मालमत्तेसह विकत घेणे, दुसऱ्या देशातील उद्योगाचे भागभांडवल विकत घेणे ही परकीय गुंतवणुकीची रूपे आहेत.

(३९) **FII : Foreign Institutional Investment : परकीय संस्थात्मक गुंतवणूक :** एका देशातील वित्तसंस्था, म्युच्युअल फंड इत्यादींनी दुसऱ्या देशांतील भांडवल बाजारात सक्रिय होऊन समभाग अथवा रोख्यांत पैसे गुंतविणे.

(४०) **Collateral: तारण अथवा गहाण**

(४१) **Growth rate: वाढीचा दर :** ठोकळ देशी उत्पादन, रोजगार, गुंतवणूक, बचत यांत ज्या दराने वाढ घडून येते तो दर. हा सामान्यपणे टक्केवारीत दर्शवितात.

(४२) **Savings Rate: बचत दर :** देशांतर्गत एकंदर बचतीचे ठोकळ देशी उत्पादनाशी असणारे गुणोत्तर वा प्रमाण

(४३) **Investment Rate: गुंतवणूक दर :** देशांतर्गत एकंदर गुंतवणुकीचे ठोकळ देशी उत्पादनाशी असणारे गुणोत्तर वा प्रमाण

(४४) **Depreciation: घसारा :** वापरामुळे झीज होऊन मालमत्तेच्या मूल्यात घडून आलेली घट. या अशा घसाऱ्यापायी मालमत्तेच्या मूल्यात होणारी घट भरून काढण्यासाठी बाजूस काढून ठेवलेल्या निधीवर कर आकारणीत जी सूट वा सवलत मिळते तिला घसारा सवलत असे म्हणतात.

(४५) **Macroeconomic Stability: समग्र आर्थिक स्थैर्य :** अर्थकारणातील विविध बाजारपेठा (वस्तू व सेवा, चलन, भांडवल, श्रम इत्यादींच्या बाजारपेठा), चलन वाढ, किंमत पातळी. व्याज दर, आयात-निर्यात व्यापार, रोजगार अशा विविध आघाड्यांवर स्थैर्याचे वातावरण असणे.

(४६) **Exchange Rate: विनिमय दर :** एका देशाच्या चलनाची दुसऱ्या देशाच्या चलनाच्या माध्यमातून व्यक्त केलेली किंमत. एक अमेरिकी डॉलर खरेदी

करण्यास जेवढे रुपये मोजावयास लागतील त्यास डॉलर व रुपयामधील विनिमय दर असे म्हणतात.

(४७) **Buoyancy of Taxes: स्थूल आंतर्देशीय उत्पादिताच्या वाढीच्या तुलनेत करसंकलनाची/ करसंकलनातील वाढीची क्षमता:** करसंकलनाच्या वाढीच्या दराचे स्थूल आंतर्देशीय उत्पादिताच्या वाढीच्या दराशी जे गुणोत्तर असते त्याने ही क्षमता मोजतात.

(४८) **Fiscal Consolidation: राजकोषीय दृढीकरण :** सरकारी तूटीवर नियंत्रण, करप्रणाली निर्दोष बनविणे, करवसुली वाढविणे, अनुत्पादक सरकारी खर्चावर आळा, अनावश्यक अनुदानांत कपात, करप्रणाली सुटसुटीत व कार्यक्षम बनविणे यांसारख्या उपायांचा अंतर्भाव असणारी कार्यप्रक्रिया म्हणजे राजकोषीय दृढीकरण.

(४९) **Special Purpose Vehicle: निधी उभारणीसाठी विशेष साधन :** एखाद्या प्रकल्पाच्या उभारणीसाठी आवश्यक असणारा निधी जमा करण्यासाठी सरकार जेव्हा खास अथवा विशेष कर्जरोखे विक्रीस काढते असे कर्जरोखे.

(५०) **Capital Account Convertibility of Rupee: भांडवली खात्यावर रुपया परिवर्तनीय बनविणे:** भारतीय नागरिकांना परदेशांत मालमत्ता विकत घेण्याची मुभा मिळणे.

(५१) **Fiscal Responsibility and Budget Management Act: राजकोषीय उत्तरदायित्त्व कायदा.**

✿✿

## भेट अंक योजना

**'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचवण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना पत्रिकेचे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.**

# जिकडे-तिकडे

## 'बर्ड फ्लू'चा प्रश्न चीनने असा हाताळला....

सध्या भारतात 'बर्ड फ्लू'ची समस्या उद्भवली आहे. चीन तर या समस्येशी गेले चार-पाच महिने झगडत आहे. त्यामुळे या संदर्भात भारताला चीनकडून बरेच काही शिकण्यासारखे आहे. चीनमध्ये जेव्हाजेव्हा 'बर्ड फ्लू''चा संसर्ग झाल्याचे आढळले तेव्हातेव्हा तेथे लगेचच तपासणी मोहीम राबविण्यात आली. संसर्ग झालेल्या पक्ष्यांमध्ये वावर असणाऱ्या माणसांचे सतत दहा दिवस निरीक्षण करण्यात आले. ताप वा फ्लूसारखी लक्षणे दिसताच पुढील तपासणीसाठी त्यांना इतरांपासून वेगळे ठेवण्यात आले वा येत होते. केवळ इतकेच नाही तर, 'बर्ड फ्लू'चा संसर्ग न आढळलेल्या इस्पितळांचीही सतत पाहणी/तपासणी करण्यात येत होतीच. मुख्य म्हणजे चीनमधील 'बर्ड फ्लू'च्या १२ रुग्णांपैकी नऊ रुग्ण हे ज्या भागांत 'बर्ड फ्लू'चा संसर्ग झालेला नव्हता अशा भागांत आढळले. त्यामुळे अशी सतत पाहणी करण्याचे महत्त्व स्पष्ट होते. ज्या रुग्णांमध्ये 'बर्ड फ्लू'सदृश लक्षणे आढळली मात्र त्याबाबतचे नेमके निदान होऊ शकलेले नाही, अशा रुग्णांची सविस्तर नोंद रुग्णालयांमध्ये ठेवण्यात येत आहे. शिवाय, विविध भागांतील आरोग्यकेंद्रे इंटरनेटवरील माहितीच्या साठ्याद्वारे जोडली गेलेली आहेत. ही माहिती सरकारच्या विविध पातळ्यांवरील संबंधित यंत्रणेलाही त्याच वेळी उपलब्ध होऊ शकत असल्याने त्यांनाही उपाययोजना करणे शक्य होत आहे. २००३मध्ये 'सार्स'चा प्रादुर्भाव झाला तेव्हा त्याबाबतची माहिती वेळेत उपलब्ध होऊ न शकल्याने झालेली हानी चीनने अनुभवली आहे. त्यावरून धडा घेऊन या वेळी चिनी प्रशासनाने 'बर्ड फ्लू'ची माहिती संबंधितांना वेळेतच उपलब्ध होईल अशी काळजी घेतली आहे. थायलंडलाही 'बर्ड फ्लू'ने गाठल्याने त्यासंबंधीची माहिती नागरिकांना व प्रशासनाला मिळण्यासाठी त्या देशाने 'स्वेच्छासेवक (volunteer) योजना' राबविली आहे. ग्रामीण भागांतील दर १५ घरांमागे एक 'स्वेच्छासेवक' अशी ही योजना आहे. चीननेदेखील तसा प्रयोग करून पाहण्याचे ठरविले आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्यावतीने चीनमध्ये कार्यरत असणाऱ्या डॉ. ज्यूली हॉल यांच्या मते 'बर्ड फ्लू'चा प्रसार रोखण्यासाठी सरकारी यंत्रणेला

आणखीही बरेच काही करता येईल. संसर्गपीडित पक्ष्यांची माहिती सरकारी यंत्रणेपर्यंत पोहचविणाऱ्यांना 'इन्सेन्टिव्ह' देणे, अशा पक्ष्यांची विल्हेवाट लावल्यानंतर दर पक्षामागे मालकांना जी नुकसानभरपाई द्यावयाची तिच्यात त्या पक्ष्यांपासून भविष्यकाळात मिळू शकणाऱ्या मिळकतीचाही अंतर्भाव करणे... असे बरेच काही. कोणत्याही प्रकारच्या 'इन्सेन्टिव्ह' शिवाय नागरिकांनी ही माहिती स्वतःहून सरकारी यंत्रणेच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे, कारण असे न करण्याने नागरिकांच्याच जीवाला धोका निर्माण होतो, ही वस्तुस्थिती नागरिकांच्या निदर्शनास आणून देण्याचीही गरज आहे, असे डॉ. हॉल यांना वाटते. *(संदर्भ - द हिंदू, २१ फेब्रुवारी २००६)*

---

*(पान १४वरून)*

काळजी घेण्याचे मोठे काम बहुतांश देशांमध्ये मुख्यतः स्त्रियांकडेच आहे, त्यामुळे स्त्री-पुरुषांच्या नोकऱ्यांबाबत 'समान काम, समान वेतन' हे धोरण राबविण्यात ही असमानता हे प्रमुख अडचणीचे कारण आहे, असे म्हटले जाते. सरकारच्या विविध कल्याणकारी योजना-उपक्रमांच्या आखणी-तामिलीत या वास्तवाचे प्रतिबिंब दरवेळी उमटतेच असे नाही. अशा, मेहेनताना न मिळणाऱ्या श्रमांची मोजदाद वा त्यांची दखलही अर्थकारणविषयक सरकारी आकडेवारीत घेतली जात नाही. घरातील वयोवृद्ध वा आजारी व्यक्तींची काळजी घेण्याच्या बिनपगारी कामाबाबतची माहिती घरातील प्रत्येक व्यक्ती - आणि विशेषतः घरातील महिला - या त्यांच्या संपूर्ण दिवसाच्या उपलब्ध वेळेचा वापर कसा करतात त्याबाबतच्या सर्वेक्षणांद्वारे (टाइम-यूझ सर्व्हे) उपलब्ध होते. मात्र, महिलांच्या या योगदानाचे वर्गीकरण आणि नोंद होतच नाही.

महिलांच्या पदरात पडणाऱ्या यांसारख्या असमान दानाची नेमकी नोंद घेतली जावी याचसाठी तर 'जेन्डर बजेट'चा खटाटोप आहे. या संकल्पनेचा व्यवहारात वापर सुरू झाल्याने सरकारी पातळीवरील आर्थिक तसेच वित्तीय घडामोडींमधील छुप्या लिंगसापेक्ष विषमतेचे नानाविध पैलू आताशा कोठे ठसठशीतपणे सामोरे येऊ लागले आहेत. या असमानतेचे उच्चाटन करण्यासाठी अर्थसंकल्पाच्या जडणघडणीतच महिलांचा सहभाग सक्रिय होईल त्या वेळी 'जेन्डर बजेट'च्या संकल्पनेचे प्राणतत्त्व समूर्त साकार होईल. *(संदर्भ - जेन्डर रिस्पॉन्सिव्ह बजेट इनिशिअटिव्ह्ज् : की डायमेन्शन्स अँड प्रॅक्टिकल एक्झाम्पल्स - डाएना एल्सन, द साउथ आफ्रिकन विमेन्स बजेट इनिशिएटिव्ह - डेबी बडलेन्डर)*

# ...करावा ग्रामोद्धार ग्रामोद्योगांनी

*गावी असावी उद्योग समिती। जी सतत करील उद्योग उन्नती।*
*गावाचे आर्थिक जीवन हाती। घेवोनी लावील सोय जी।।*
*उद्योगहीनांना उद्योग द्यावे। कामे देवोनि सुखी करावे।*
*आपणासमान पाहिजे बरवे। केले त्यासि सुखवस्तु।।*
*जयास न मिळे कामधाम। त्याने समितीस सुचवावे नाम।*
*ग्रामसेवाधिकारी उद्यम। देईल त्यासि ।।*
*काम देणे कर्तव्यचि त्याचे। जमा असती फंड गावाचे।*
*त्यातूनि पुरवावे मोल कामाचे। उपयोगी ऐशा।।*
*मजुरा मजुरी पूर्ण द्यावी। जेणे मुलेबाळे सुखे जगवी।।*
*तैसीच उत्पन्ने वाढवोनि घ्यावी। गावामाजी।।*
*याने सर्वांस मिळेल सुख। मिटेल जीवनाची भूक।*
*ग्रामराज्य होईल सुरेख। आर्थिकतेने समृद्ध ।।*
*यास्तव श्रीमंत, शिक्षित, हुद्देदार।कलावंत, शेतकरी, कामगार*
*सर्वांनी मिळोनि ग्रामोद्धार। करावा ग्रामोद्योगांनी।*
*शहराकडे चालला प्रवाह। तो थांबवाया निःसंदेह।।*
*सर्वांचा गावीच होईल निर्वाह। ऐसी योजना करावी।।*
*खेडेचि शहराचे जनक। शहर भोवते खेडे उत्पादक।*
*शहराकडे न जाता लोक। धावावे उलट खेड्याकडे ।।*
*ऐसी करावी ग्रामसेवा। हेचि कर्म आवडे देवा।*
*संशय काही मनी न धरावा । तुकड्या म्हणे ।।*

‘राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने’च्या अंतरंगाचा परिचय असलेल्या कोणालाही तुकडोजींच्या द्रष्टेपणाचे सादर कौतुक वाटल्याखेरीज राहणार नाही. किंबहुना, या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने जी कार्यपद्धती आज

प्रस्तावित केलेली आहे तिचे बीजरूपाने सूचन तुकडोजींनी तब्बल ५५-५६ वर्षांपूर्वीच केले होते, हे अत्यंत कौतुकास्पद आणि तुकडोजींप्रतीचा आदर द्विगुणित करणारे आहे. 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने'तर्गत इच्छुकांना काम देण्याची जबाबदारी सरकारवर आहे. मात्र, तुकडोजींच्या डोळ्यासमोरील आदर्श, आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्थेत ही जबाबदारी गावच आपल्या हिंमतीवर पेलते. आज, गावातील रोजगारेच्छुकांसाठी कामे शोधण्याचे उत्तरदायित्व हे ग्रामसभा आणि पर्यायाने ग्रामपंचायतीवर या योजनेने सोपविलेले आहे. नेमक्या याच कामासाठी प्रत्येक गावामध्ये एक उद्योग समिती कार्यरत असावी, असे तुकडोजी सुचवितात. 'ग्रामगीते'ची प्रथम आवृत्ती प्रकाशित झाली ती १९५५ साली. त्या नंतर पाच वर्षांनी म्हणजे १९६० साली महाराष्ट्र राज्याने ग्रामपंचायतींसाठीचा कायदा तयार केला. ग्रामपंचायतीने आपल्या कार्यक्षेत्रातील विकासविषयक योजना-उपक्रमांसाठी पंचायत सदस्यांचा समावेश असणाऱ्या विषयवार समित्या स्थापन कराव्यात, अशी एक तरतूद या कायद्यात आहे. आरोग्यासाठी आरोग्य समिती, शिक्षणासाठी शिक्षण समिती ही झाली याची काही उदाहरणे. ग्रामपंचायतीचा कारभार पाहण्यासाठी ग्रामस्थांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींचा समावेश या समित्यांमध्ये असल्याने आपापल्या पंचायत क्षेत्रातील विकासविषयक कामांसंदर्भात या समित्यांच्या माध्यमातून पंचायत सदस्य दक्ष व सक्रिय असावेत, ही यामागील कल्पना. मात्र, पंचायतींचा हा कायदा अस्तित्त्वात येण्यापूर्वीच, गावातील होतकरू आणि रोजगाराच्या शोधात असणाऱ्यांना उचित असे काम मिळावे यासाठी गावपातळीवर उद्योग समिती कार्यरत असावी, असा आग्रह तुकडोजी धरतात. पुन्हा, उद्योगांच्या गावपातळीवरील उन्नतीसाठी ही उद्योग समिती स्वयंप्रेरणेने सक्रिय असावी, अशी तुकडोजींची अपेक्षा आहे. केवळ कायद्याचा बडगा आहे म्हणून अशा समित्यांचे कर्मकांड साजरे होऊ नये, याबाबत तुकडोजींचा कटाक्ष आहे. गावातील लोकांसाठी गावपातळीवरच उद्योग वा कामे हाती घेतली जावीत, त्यासाठी गावानेच ग्रामस्थांच्या योगदानातून गावपातळीवर एक फंड निर्माण करावा, असेही तुकडोजी सांगतात. याचाच अर्थ हा की गावोगावी रोजगारनिर्मिती करण्यासाठी गावकऱ्यांनी पुन्हा सरकारी मदत वा अनुदानाची वाट पाहत थांबणे, हे तुकडोजींना मान्य नाही. असे झाले तरच गावातच रोजगारनिर्मिती होऊन शहरांकडे वाहणारा लोंढा रोखला जाईल, असे तुकडोजी बजावतात. तुकडोजींचे हे स्वप्न 'ग्रामगीते'च्या प्रकाशनानंतर आज ५१ वर्षांनी तरी वास्तवात उतरले आहे का ? ✿✿




## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१५ ऑक्टोबर २००४ पासून)

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० /- रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० /- रुपये |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० /- रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका** - (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) अर्थबोधपत्रिकेचा मेंदूसंशोधन विशेषांक (फेब्रुवारी - मार्च २००५) - (किंमत चाळीस रुपये)

नियतकालिकांच्या मालकी हक्क व इतर तपशीलाबाबत फेब्रुवारीनंतर प्रसिद्ध होणाऱ्या पहिल्या अंकामध्ये प्रसिद्ध करावयाचे प्रगटन, नियतकालिकांच्या रजिस्ट्रेशनबाबत केंद्र सरकारच्या १९५६ मधील नियम (क्रमांक ८)नुसार फॉर्म ४

| | |
|---|---|
| (१) नियतकालिकाचे नाव : | 'अर्थबोधपत्रिका' |
| (२) प्रकाशनस्थळ : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (३) नियतकालिकाचे स्वरूप : | मासिक |
| (४) प्रकाशकाचे नाव : | रामदास होनावर |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (५) मुद्रकाचे नाव : | रामदास होनावर |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (६) संपादकांचे नाव : | अभय टिळक |
| राष्ट्रीयत्व : | भारतीय |
| पत्ता : | 'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ०१६ |
| (७) मुद्रणस्थळ : | एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट,<br>२०५ शनिवारपेठ, पुणे - ४११०३० |
| (८) नियतकालिकाच्या मालकांचे किंवा एकूण भांडवलापैकी एक टक्क्यांहून अधिक भाग धारण करणाऱ्या भागधारकांची नावे व पत्ते : | 'इंडियन स्कूल ऑफपोलिटिकल इकॉनॉमी'<br>(भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी)<br>'अर्थबोध,' ९६८/२१-२२,<br>सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६ |

मी, रामदास होनावर, याद्वारे प्रमाणित करतो की वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

रामदास होनावर

दिनांक - १ मार्च २००६ (प्रकाशकाची सही)

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502
Posted at Market Yard P.S.O. on 10th of each month

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■ 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका योग्य नमुन्यात प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

## - संस्थेचे नियंत्रण मंडळ -

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**